आला आला पाऊस आला..
रेनकोट / 2 in1 जर्किन
लहान मुलांपासून सर्वांसाठी
Branded Zeel/Boss/Only One Complete Range..!
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

Elite banquet
A.C. बँक्वेट हॉल
अहिल्यानगर मध्ये पहिल्यांदा ए.सी. बँक्वेट हॉल,
भव्य हॉल व प्रशस्त पार्किंग
* वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस
* शुभकार्य, साखरपुडा
* डोहाळे जेवण, मुंज
* नामकरण समारंभ
* कॉर्पोरेट इव्हेंट्स्
व इ. कार्यक्रमासाठी उपलब्ध
हॉटेल संकेत
टिळक रोड, स्वस्तिक चौक, स्टेशन रोड, अहिल्यानगर
9422222020

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. ०९.०६.२०२५ | अंक नं. ५९ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉइंट | पॉइंट्सवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

22 कॅरेट सोन्याचा सर्वात कमी दर
दागिन्यांच्या मजुरीवर 20%* पर्यंत सूट
ठुशी, कुंदन ज्वेलरीच्या मजुरीवर 50%* पर्यंत सूट
आपला जुना दागिना एक्सचेंज करा आणि मिळवा 100%* किंमतीचा परतावा.
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड,
सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

## भुईकोट किल्ल्याच्या परिसरात चोरट्यांचा उच्छाद

नगर – मोठा ऐतिहासिक वारसा असलेल्या नगरच्या भुईकोट किल्ल्याच्या बाहेरील बाजूस असलेल्या खंदकाच्या दगडी संरक्षक भिंतीवरील लोखंडी जाळ्या चोरीला जात असून तसेच त्यासाठी दगडी कठडे पडून किल्ल्याचे विद्रुपीकरण केले जात आहे. या समाज कंटकांवर पोलिस व प्रशासनाने तसेच सैन्य दलाने तातडीने कारवाई करावी अशी मागणी शहरातील इतिहासप्रेमी नागरिकांनी केली आहे.

काही वर्षांपूर्वी नगर शहरातील या ऐतिहासिक वैभवशाली भुईकोट किल्ल्याच्या सुशोभीकरणास शासनाने निधी दिला होता. या निधीतून किल्ल्याच्या बाहेरील खंदकाच्या बाहेरील बाजूने दगडी सुरक्षा भिंत बांधण्यात आली होती व त्या भिंतीमध्ये लोखंडी जाळ्या बसवण्यात आल्या होत्या. आत्ता सध्याला या लोखंडी जाळ्या समाजकंटकांकडून चोरुन नेण्याचे काम चालू आहे व ते जे दगडी बुरुज बांधले आहेत ते पण तोडण्याचे काम चालू आहे.

हा अत्यंत खेदजनक आणि नगरकरांच्या मनाला वेदना देणारा प्रकार आहे. किल्ल्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान करण्याचे काम समाजकंटकांकडून चालू आहे व त्यामुळे किल्ल्याचे विद्रुपीकरणही होत आहे, त्यामुळे जिल्हा प्रशासन, भारतीय सैन्य दल व भिंगार कॅम्प पोलिसांनी या प्रकाराकडे गांभीर्याने लक्ष देवून अशा समाजकंटकांवर तातडीने कारवाई करावी अशी मागणी शहरातील इतिहासप्रेमी नागरिकांनी केली आहे.

दगडी संरक्षक भिंतीवरील लोखंडी जाळ्या जाताहेत चोरीला



## १४ जूनपर्यंत तापमानात वाढ आणि काही ठिकाणीच मेघ गर्जनेसह पाऊस

### शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये

मुंबई – गेल्या जवळपास दोन आठवड्यापासून राज्यातील मान्सूनचा प्रवास पूर्णपणे रखडला आहे, आणि किमान १५ जूनपर्यंत तरी तो रखडलेलाच राहणार आहे. यामुळे १४ जूनपर्यंत पश्चिम किनारपट्टी वगळता राज्यातील विविध भागांमधील तापमानात वाढ होण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा आणि खानदेशातील कमाल तापमान अधिक राहण्याचा अंदाज आहे. या दरम्यान पूर्व विदर्भात कमाल तापमानात अजून वाढ होऊन ते ४५ अंशापर्यंत जाण्याचा अंदाज आहे, तर विदर्भातील बऱ्याच भागात कमाल तापमान ४० अंशापेक्षा अधिक राहणार असल्याचा अंदाज आहे. मराठवाडा आणि खानदेशातील अनेक भागात कमाल तापमान ४० अंशाच्या आसपास राहण्याचा अंदाज देखील आहे.

१४ जूनपर्यंत राज्यात सार्वत्रिक आणि मान्सूनचा पाऊस अपेक्षित नाही. पाऊस हा प्रामुख्याने दुपार नंतर आणि मेघ गर्जनेसह काही भागातच पडेल, ज्याची शक्यता या आठवड्याच्या सुरुवातीला दक्षिण मराठवाडा आणि दक्षिण मध्य-महाराष्ट्रात अधिक राहील. तुलनेत राज्यातील इतर भागात विखुरलेल्या स्वरूपाचा पाऊस अपेक्षित आहे.

दरम्यान कमाल तापमान अधिक राहणार असल्यामुळे आणि सार्वत्रिक मान्सूनचा पाऊस अपेक्षित नसल्यामुळे शेतकऱ्यांनी (प्रामुख्याने कोरडवाहू) पेरणी व लागवडीची घाई करू नये, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.

## रखडलेल्या रस्त्यांची कामे पूर्ण करा अन्यथा १ जुलैला मनपावर हल्लाबोल

नगर – शहरातील गांधी मैदान, जुना कापड बाजार, माणिकचौक, तख्ती दरवाजा या भागातील रस्ते अनेक महिन्यांपासून महानगरपालिकेच्या नियोजनशून्य कार्यप्रणालीमुळे अद्याप अपूर्णच आहेत. सदर ठेकेदाराला आयुक्तांनी ३१ मेपर्यंत रस्ते पूर्ण करण्याचे आदेश दिले होते परंतु आजतागायत (९ जून) कामे पूर्ण झालेली नाहीत. अत्यंत संथगतीने, कोणाचेही काही देणे घेणे नाही, अशी परिस्थिती सध्या पाहायला मिळत आहे. लोकप्रतिनिधींचे कोणतेही याकडे लक्ष नाही, हे विशेष.

या खड्ड्यामुळे दररोज अपघात होत आहेत. आरोग्याला प्रचंड धोका निर्माण झालेला असून, १६ जूनपासून शाळा सुरु होणार तसेच मोहरमला २७ जूनपासून सुरुवात होणार आहे. मोहरम पाहण्यासाठी महाराष्ट्रातून सर्वधर्मीय लोक सहभागी होतात, परंतु महानगरपालिका व जिल्हा प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष असून, हे गंभीर प्रश्न सोडविण्यात यावे, याबाबतचे निवेदन समाजवादी पार्टीच्यावतीने शहर जिल्हाध्यक्ष आबिद हुसेन यांनी महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांना दिले आहे.

आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सदर रखडलेले रस्त्यांची कामे तसेच मोहरम मिरवणूक मार्गातील रस्ते त्वरित पूर्ण करावे, ३० जूनपर्यंत सदर कामे पूर्ण झाली नाही तर या निषेधार्थ समाजवादी पार्टी १ जुलै रोजी महानगरपालिकेवर हल्ला बोल आंदोलन करणार आहे, असा इशाराही निवेदनात देण्यात आले आहे.

निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, तोफखाना पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक आनंद कोकरे, आमदार अबू आझमी यांना पाठविल्या आहेत.

SONI TILES
Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज

पुरुषांसाठी प्रिमियम कॉलिटी
टी-शर्ट / शर्टस् / फॉरमल पँट
ट्राऊजर्स / नाईट पँट
भरपूर व्हरायटीज्
मर्यादित स्टॉक
काहीही घ्या
₹ 200 ला एक
व ₹ 500 मध्ये तीन
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल
पुरुषांसाठी सर्व काही
शुभ मॉल
मयुरी लेडिज मॉलच्या वर
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर. ९०२८२०११८८

DCM SHRIRAM
Growing with trust
Fenesta
Better by Design
भारताची नंबर 1
खिडक्यांचा आणि दरवाजांचा ब्रँड

uPVC | Aluminium | Doors | Façades
आता अहिल्यानगर (अहमदनगर) मध्ये आहे.
CHANDAN GLASS
Shop No. 5, Venkatesh Prime, Near Anand Dham, Ahilya Nagar.
Call: 9860119223 / 9823189592

॥ दशक्रिया विधी ॥
ऐसा जन्म लाभावा,
देहची चंदन व्हावा ।
आयुष्य संपले तरी,
सुगंध दरवळत रहावे

कै. सोमनाथ शामराव देवळालीकर
यांचे अल्पशा आजाराने दि. २/६/२०२५ रोजी
दु:ख निधन झाले आहे, त्यांचा
दशक्रिया विधी बुधवार दि. ११/६/२०२५ रोजी
सकाळी ९ वा. अमरधाम, अहिल्यानगर येथे होईल
शोकाकुल
श्रीमती प्रमिला सोमनाथ देवळालीकर
सौ. जया किशोर महाले (मुलगी)
श्री. विजय सोमनाथ देवळालीकर
सौ. श्वेता विजय देवळालीकर
विश्वेन विजय देवळालीकर (नातू)
कु. कृष्णा विजय देवळालीकर (नात)
समस्त देवळालीकर, कायगांवकर, वालकर, महाले, कुलथे, सोनार परिवार
* दशक्रिया प्रसाद - विठ्ठल रुक्मिणी (सोनार समाज) मंदिर, कोर्टगल्ली, नालेगाव, अहिल्यानगर

# गृहिणी

## आरोग्य

### पावसाळा व मधुमेह

साखरेच्या रुग्णांची रोगप्रतिकारक शक्ती थोडी कमकुवत असते आणि पावसाळ्यात ती आणखी आव्हानात्मक बनते. जास्त आर्द्रता, तापमानात अचानक चढउतार, अन्नातील निष्काळजीपणा आणि स्वच्छतेचा अभाव हे मधुमेहींच्या आरोग्यासाठी या ऋतूत मोठा धोका बनतात. जर वेळीच खबरदारी घेतली नाही तर रक्तातील साखरेची पातळी असंतुलित होऊ शकते आणि संसर्ग, जखमा बरे होण्यास उशीर, त्वचेचे आजार आणि पचनाच्या समस्या देखील उद्भवू शकतात. मधुमेह हा एक आजार आहे जो आतून प्रभावित करतो आणि पावसाळा त्याला चालना देऊ शकतो. म्हणून, वेळोवेळी साखरेची पातळी, रक्तदाब, लघवी, पायांचे आरोग्य आणि डोळ्यांची तपासणी करणे खूप महत्वाचे आहे. कोणतेही लक्षण लहान नसते, सावधगिरी हाच एकमेव बचाव आहे. तुमच्या रक्तातील साखरेची पातळी नियमितपणे तपासत रहा आणि वेळेवर औषधे घ्या. घरगुती उपाय करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्या.

## पाककला

### व्हिक्टोरिया वडा

**साहित्य :** १ कप भिजवलेली मूग डाळ, २ हिरव्या मिरच्या, काही कडीपत्ता पाने, १ इंच आल, चवीनुसार मीठ, १ टीस्पून लाल तिखट, १/४ टीस्पून हळद, कुटलेले धणे, बडीशोप आणि जीरे, १ टीस्पून धणे पूड, १ टीस्पून कसुरी मेथी, १ टेबलस्पून मोहरीचे गरम तेल, तळण्यासाठी तेल,

**कृती :** सर्व प्रथम मूग डाळ स्वच्छ धुवून त्यात पाणी घालून ४ तास भिजत घालावी. नंतर डाळ उपसून ती मिक्सरच्या भांड्यामध्ये घाला. त्यात कडीपत्ता, मिरची आणि आलं घालून कोर्स वाटून घ्या. तयार डाळ एका मिक्सिंग वाटी मध्ये काढून घ्या. त्यात वरील सर्व जिन्नस घालून मिक्स करा व शेवटी मोहरीचे तेल गरम करून त्यात घाला. आणि डाळ व्यवस्थित फेटून घ्या.

एका वाटीला ओला सुटी कपडा दाखवल्या प्रमाणे गुंडाळून घ्या. त्यावर तयार मिश्रण थापून घ्या. कढई मध्ये तेल गरम करून त्यात थापलेले वडे अलगद सोडून तळून घ्या. वडे पुरी सारखे फुटतील. अतिरिक्त तेल काढून घ्या.

## वास्तू

### किचन संबंधी

* बेडरूमच्या वर अथवा खाली स्वयंपाक घर असू नये.
* स्वयंपाक घराच्या दरवाज्यासमोर शेगडी नसावी.
* स्वयंपाक घराच्या भिंतीना काळा रंग कधीच देऊ नये.
* किचनचा ओटा काळ्या ग्रॅनाईटपासून बनवू नये. हिरवा आदी रंगांचा असावा.
* किचन सिंक ईशान्य अथवा उत्तर दिशेला असणं शुभ मानलं जातं.

## सल्ला

टोमॅटो संपले असतील तर ग्रेव्ही करताना तुम्ही टोमॅटो केचपचा वापर करू शकता.

## सौंदर्य

बहुतेक लोक त्यांच्या चेहऱ्यावरील मेकअप काढण्यासाठी वाईप्सचा वापर करतात. पण वाइप्सच्या अतिवापरामुळे आपल्या चेहऱ्याची त्वचा सैल होऊ लागते. चेहऱ्यावरील मेकअप काढण्यासाठी तुम्ही खोबरेल तेल वापरू शकता.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

मंगळवार, दि. १० जून २०२५

**वटपौर्णिमा, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, ज्येष्ठ शुक्लपक्ष, अनुराधा १८।०२, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०५ वा. ४० मि.**

## राशिभविष्य

**मेष** : कोणाकडून पूर्वी कर्ज घेतले असेल तर आज तुम्ही ते फेडण्यात यशस्वी व्हाल. आज तुम्ही तुमच्या मित्रासोबत पार्टी कराल.

**वृषभ** : आरोग्याबाबत जागरूक राहावे लागेल. गोड बोलून समोरच्यांकडून आपले काम काढून घेण्याची कला आज आत्मसात करावी लागेल.

**मिथुन** : आज कोणतीही मालमत्ता खरेदी किंवा विक्री करण्याचा विचार करत असाल तर वडिलांचा सल्ला घेऊन त्यातील कायदेशीर बाबींचा अभ्यास करावा लागेल

**कर्क** : आज जर तुम्हाला घरामध्ये किंवा व्यवसायात कोणाच्या बोलण्याचे वाईट वाटले तर गोष्टी तुमच्या मनात ठेवा त्यांना काही बोलायला जाऊ नका.

**सिंह** : नोकरीच्या शोधात असणाऱ्या लोकांना आज चांगली संधी मिळू शकते ज्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल.

**कन्या** : भविष्यात तुमची फसवणूक होऊ शकते. आज तुम्हाला तुमच्या सासरच्या लोकांकडून आदर मिळेल. तुमच्या एखाद्या मित्राकडून गिफ्ट देखील मिळू शकते.

**तूळ** : मनासारखी नोकरी मिळाल्याने तुम्हाला आनंद होईल. आज संध्याकाळी तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसोबत धार्मिक स्थळी जाल.

**वृश्चिक** : काही प्रभावशाली लोकांकडून एखादी महत्वाची माहिती देखील मिळू शकेल. तुम्ही उधार दिलेले पैसे आज परत मिळतील. ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल.

**धनु** : आजचा दिवस तुमच्या साहस आणि शौर्यामध्ये वाढ करणारा असेल. नोकरदार लोकांना आज सहकाऱ्यांसोबत फिरायला जाण्याची संधी मिळू शकते.

**मकर** : आज तुम्ही तुमच्या प्रगतीने तुमच्या कुटुंबातील सदस्यांना आश्चर्यचकित करू शकता. मुलाच्या अचानक आजारपणामुळे तुम्हाला धावपळ करावी लागू शकते


**कुंभ** : आजचा दिवस तुमच्यासाठी आनंदी असेल. नवीन वाहन खरेदी करण्यासाठी आज कुटुंबातील सदस्यांचा सल्ला घेऊ शकता. मातृचिंता सतावेल.

**मीन** : परस्पर प्रेम वाढेल. व्यवसायातही तुमचे कोणी शत्रू असतील तर आज ते तुमच्यापुढे नतमस्तक होतील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# शब्दगंध क्र. ७१९५

सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) या वनस्पतीसाठी हनुमानाने चक्क द्रोणागिरी पर्वतच उचलून आणला ४) अस्ताव्यस्त पसरलेल्या वस्तू ६) पुरुषाचे एक नाव; एक संत - ++++ सोनार ८) हमेशा; नेहमी ९) सकस; सत्त्वयुक्त ११) महिना; माह; माहे १२) पैसा; अडका १३) लहान अपुरे धोतर १४) विश्वास; खात्री; खातरजमा १५) चार वेळेस १७) जुन्या काळातील एक चित्रपट अभिनेत्री जी नृत्यांगना म्हणूनच गाजली १८) दैव; प्राक्तन; प्रारब्ध १९) मोठे गाव; शहर

**उभे शब्द :-** १) समाधानी; तृप्त २) जंगलातील वास्तव्य ३) पाणी; जल; जीवन ४) पंख असलेली गोष्टीतील स्त्री ५) 'दासबोध'कर्ते मराठी संत ७) उपस्थित ८) वृत्त; वार्ता; बातमी ९) कटी; कंबर १०) पुरुषाचे एक आदरार्थी टोपणनाव १२) पोते वगैरे शिवण्याची मोठी सुई १३) पाच तोंडांचा; सिंह १६) मुंबईतील एक भाग; लाकडी जिना; शिडी

शब्दगंध क्र. ७१९४ चे उत्तर



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलन : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : स्वार्थ साधून तीर्थ करण्यात काहीच अर्थ नाही... इतकं जरी समजलं तरी जन्म व्यर्थ नसतो...

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### मोबाईलचा शोध कोणत्या शतकात लागला?

मोबाईल फोनचा शोध विसाव्या शतकात लागला. सुरुवातीच्या मोबाईलचा शोध १९७० किंवा १९८० च्या दशकाच्या सुरुवातीला लागला. १९८० च्या दशकाच्या उत्तरार्धात, ते फक्त श्रीमंत लोकांसाठी किंवा वेगवेगळ्या ठिकाणी काम करणाऱ्या प्लंबर आणि इलेक्ट्रिशियनसारख्या कारागिरांसाठी परवडणारे होते. १९९० च्या दशकाच्या मध्यापर्यंत, ते सर्वांना परवडणारे झाले. एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात स्मार्टफोनचा शोध लागला.

पण जर तुम्ही मोबाइल म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खेळण्याबद्दल किंवा कलाकृतीबद्दल बोलत असाल, जिथे विविध वस्तू वेगवेगळ्या लटकणाऱ्या दांड्यांपासून लटकवल्या जातात, तर ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरीनुसार, या शब्दाचा पहिला वापर १९३२ मध्ये अलेक्झांडर काल्डरच्या कलाकृतींचे वर्णन करण्यासाठी झाला होता.

भ्रमणध्वनी हे एक इलेक्ट्रॉनिक्स उपकरण (यंत्र) असून याचा दूरसंचारासाठी उपयोग केला जातो. याला इंग्रजीमध्ये मोबाईल फोन (मोबाईल) किंवा सेल्युलर फोन (सेल फोन) असे म्हणतात. भ्रमणध्वनीच्या साहाय्याने संभाषणाची व माहितीची देवाणघेवाण करता येते. पारंपरिक दूरध्वनी उपकरणे घरामध्ये एकाच जागी ठेवून वापरावी लागतात.

जगातील पहिला मोबाईल फोन मोटोरोला कंपनीच्या मार्टिन कूपर ह्या व्यक्तीने १९७३ साली विकसित केला व वापरून दाखवला. १९९० साली जगभरात १.२४ कोटी मोबाईल फोन वापरकर्ते होते. २००९ साला अखेरीस हा आकडा ४.६ अब्ज इतका आहे. सध्या विकसित देशांमधील १०० व्यक्तींपैकी ९७ तर जगातील १०० व्यक्तींपैकी ४५ व्यक्ती मोबाईल फोन वापरतात.

### कर्णपुत्र वृषकेतू

कौरव पांडवांच्या महायुद्धात कौरवांचा नाश झाला. पण या युद्धात अर्जुनपुत्र अभिमन्यू तसेच भीम व पद्मावती यांचा एक मुलगा धारातीर्थी पडला. अभिमन्यूची तर तो पडल्यावरही कौरवांनी विटंबना केली. यामुळे अर्जुनाचा राग अनावर झाला. आपणही कौरवांच्या पोराबाळांचा नाश करावा, असे त्याला वाटले. कौरवांचे पुत्र तसेच उदरातील पुरुषगर्भ या सर्वांचा नाश करणारा वज्रबाण त्याने अभिमंत्रून सोडला. त्याच्या प्रभावाने कौरवांचे हजारो पुत्र मरण पावले. याच वेळी कर्णाची एक पत्नी प्रभावती प्रसूत होऊन तिला वृषकेतू नावाचा मुलगा झाला होता. कर्ण दोनच दिवसांपूर्वी रणात पडला होता. आता निदान हा वृषकेतू तरी वाचावा म्हणून ती धृतराष्ट्राकडे त्याला घेऊन गेली व त्याचे संरक्षण करण्यासाठी विनवू लागली.

पण धृतराष्ट्राने असहायता व्यक्त केली. यानंतर प्रभावती वृषकेतूला घेऊन कुंतीकडे गेली. कुंतीला त्याला पाहून कर्णाची आठवण झाली. त्याच्या मुलाला आपण वाचवले पाहिजे, असे तिला वाटले. एवढ्यात अर्जुनाचा बाण तेथे आला. पण कुंतीने त्याला परत जाण्याची आज्ञा केली. याप्रमाणे वृषकेतूची जबाबदारी कुंतीवर सोपवून प्रभावती कर्णाबरोबर सती गेली.

कुंती मोठ्या प्रेमाने पण गुप्तपणे त्याचे पालनपोषण करू लागली. पुढे वृषकेतू थोडा मोठा झाल्यावर त्याला हे असे राहणे नकोसे वाटू लागले. कुंतीने त्याला सर्व हकिगत सांगितल्यावरही तो आपल्या नशिबावर विसंबून उघडपणे राहतो म्हणू लागला. पुढे तो द्रौपदीच्या दृष्टीस पडला. हा सुंदर व तेजस्वी मुलगा तिला आवडला. कुंतीप्रमाणे तीही त्याच्याशी प्रेमाने वागू लागली. द्रुपदराजाकडून मिळालेले एक धनुष्यही त्याला दिले. कुंती वृषकेतूला धर्मार्जुनापासून काही त्रास होऊ नये म्हणून जपत असे. तो स्वसंरक्षणासाठी सिद्ध व्हावा म्हणून तिने सूर्याचे स्मरण केले. कर्ण सूर्याचा मुलगा असल्याने सूर्याने वृषकेतूला सर्व विद्या शिकवल्या.

पुढे अश्वमेध यज्ञप्रसंगी कुंती वृषकेतूला घेऊन पांडवांकडे गेली. जो आपल्या कुळाला सोडून शत्रुपक्षाकडे गेला, धर्मासारख्या साधूचा ज्याने आश्रय सोडला, त्या आपल्या पित्याला पांडवांनी मारल्याबद्दल आता त्याला फारसा विषाद वाटेना. कर्णपुत्राची एकंदर हकिगत ऐकून सर्व पांडवांना कर्णाबद्दल अतिशय वाईट वाटले. कर्णपुत्राचा आपल्याला लाभ झाला म्हणून त्यांना समाधान वाटले.

## जीवन का अमृत (भाग १)



पर जब हमें अपनी कमियों का अहसास होगा, तभी हम इन्हें दूर कर सकते हैं और सही दिशा में बढ़ सकते हैं। सत्संग को तर्क-वितर्क की जगह न बनाओ। नामलेवाओं को सलाह दी जाती है कि वे किसी भी विवादास्पद प्रश्न से दूर रहें। पर इसका मतलब यह नहीं कि आप किसी भी प्रश्न, जो इस पवित्र रास्ते से संबंधित है, पर रोशनी न डालें। विक्रम रहकर, हर आलोचना से, किसी को ऊँचा या नीचा दिखाने से या एक खुले वाद-विवाद से दूर रहना चाहिए।

अपने पति के प्रति आपकी टिप्पणियों को मैंने पढ़ा। वह मुझे बहुत प्रिय है और मैं उसकी रूहानी सफलता की कामना करता हूँ। उसके प्रति आपका रवैया दयालुता और धैर्य का होना चाहिये। आप कभी भी बेसब्र न हों, बल्कि सहनशील रहें। सभी

### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

आध्यात्मिक जिज्ञासु ऐसी अनूठी सहनशीलता और नम्रता को धारण करें, ताकि दूसरे लोग जान सकें कि वे एक जिंदा सतुरु से संबंधित हैं। एक संतुलित मन कभी भी छोटी सी बात से विचलित नहीं होता। हम पानी में ही तैरना सीख सकते हैं और हम अपने रोजमर्रा के जीवन को ऐसा बनाएँ कि हम रोजाना कोई न कोई नई चीज सीखें। धैर्य तथा नम्रता का होना और अहम् भाव का नाश ऐसे प्रभावशाली गुण हैं, जिन्हें एक नामलेवा की जिंदगी में मुख्य स्थान मिलना चाहिए। आप समय आने पर इस क्षेत्र में तरक्की करेंगी। जो व्यक्ति, अपने बारे में दूसरों के विचारों से प्रभावित और विचलित हो जाता है, वह अवश्य ही अभी तक अपने अहंकार के वश में है, उसने अपने अहम् को नहीं जीता है और वह रूहानियत की क, ख, ग को भी नहीं समझा है ।

प्रेम और आत्मसमर्पण को अपने जीवन का आधार बना लो। ऐसा करने पर तुम पाओगे कि तुम्हारी जिंदगी रोज एक वरदान है। यह रास्ता सीधा, तंग और मुश्किल, बहुत मुश्किल और सधा हुआ है, पर जो सच्चा जीवन जीता है, उसको हर प्रकार की सहायता का वायदा है, ताकि वह लक्ष्य को प्राप्त कर सके। सदाचारी जीवन के लिए जरूरी सद्गुणों का विकास हम धैर्य से, प्रबल इच्छा पैदा करके कर सकते है और हमारी जो भी कमियाँ हैं, उन्हें हम सावधान और सतर्क रहकर निकाल सकते हैं।

कृपया दूसरे लिंग के व्यक्ति की आँखों में भी देखने से बचें। एक सच्चा, विनम्र और आज्ञाकारी आध्यात्मिक जिज्ञासु अपनी कोशिशों को ऊपर काम कर रहीं दयालु गुरु-शक्ति को समर्पित करके, किसी भी परिस्थिति को पार कर जाएगा।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

ऐसे लोग अपराध बोध से ग्रसित हो जाते हैं। आप ध्यान साधना में बैठे और मन सिनेमा, सीरियल एवं क्रिकेट आदि में लगा रहता है तो यह एकाग्रता नहीं है। आपका आज्ञा चक्र बीमार है, कमजोर है। ऐसी दशा में लोग खाना पीना, घरेलू कामकाज, दोस्ती, रिश्तेदारी सब छोड़ कर साधना करने लगते हैं।

आहार से हमें शारीरिक और मानसिक शक्ति मिलती है। खाना न खाने से दिमाग की कोशिकायें नष्ट होने लगती हैं। दिमाग की कोशिकायें अगर एक बार नष्ट हो जाती हैं तो दुबारा कभी जीवित नहीं होती। मनुष्य उम्र भर शारीरिक और मानसिक रुप से बीमार रहने लगता है। सम्पूर्ण भोजन करो और बाजार का खाना बंद करो। अगर नींद पूरी नहीं करते हैं तो दिमाग का वह हिस्सा जो एकाग्रता को नियंत्रित करता है कमजोर हो जाता है और इस का असर आप के कार्यों एवं साधना पर भी पड़ता है। इसलिये पूर्ण नींद लेनी चाहिये। कई बार साधना में बैठते तो हैं परंतु मन पेन्डिंग कामों पर चला जाता है

### आज्ञा चक्र

। मन फिल्मों की ओर चला जाता है, सीरियल और क्रिकेट मैच आदि पर चला जाता है। इस का कारण यह है कि आज्ञा चक्र कमजोर है।

ऐसी दशा में जो भी काम याद आये उन्हें लिख लो फिर उन्हें बाद में पूरा करो और लिस्ट से काट दो। लिख लेने से वे बातें बार बार नहीं आयेगीं। आप साधना में लगे रहेंगे। कुछ कड़वी स्मृतियां मनो मस्तिष्क पर छाई रहती हैं, इस का प्रतिकूल प्रभाव दिमाग पर पड़ता है और स्मरण रखने योग्य बातें वा ज्ञान के बिंदू हमें याद नहीं रहते। जिस से खाली खाली महसूस करते हैं। ऐसी दशा में अपनी मन पसंद पुस्तकें पढ़ा करो। कहानीयों की पुस्तकें पढ़ने से ज्ञान की पोइंटस सहज याद रहती हैं। कई बाते एकाग्रता में भंग डालती हैं, ऐसी जितनी भी बातें वा काम याद आयें उन्हें प्यार से कहते रहो अभी मैं भगवान को याद कर रहा हूं तुम्हारे बारे बाद में सोचूगां और उन पर सोचने के लिये एक समय निर्धारित कर लो। उस निर्धारित समय ही उन के बारे सोचें। कुछ बुरी बाते जिनके बारे हम कुछ नहीं कर सकते उन्हे बुरा सपना समझ भूल जाओ। उन घटनाओं से सम्बंधित जो व्यक्ति हैं उन को मन में कहते रहो आप का कल्याण हो। लेट कर या आराम से लिहाफ ओढ़ कर साधना करते हैं या पढ़ते हैं तो उन्हे उस समय नींद बहुत सताती है या सिरदर्द होने लगता है। सही मुद्रा में सीधे बैठ कर पढ़ें या साधना करें। लेट कर या टेबल पर झुक कर ना बैठें। इस से आज्ञा चक्र शक्तिशाली बनता है। नींद नहीं आती। साधना में बैठते हैं या और कोई पढ़ने लिखने का काम करते हैं तो शुरू में ध्यान ठीक से एकाग्र रहता है पर बाद में एकाग्रता भंग हो जाती है। दिमाग भटकने लगता है। एक साथ कई चीजें मन की एकाग्रता को रोक रही होती हैं मन इधर उधर भटक रहा होता है।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**तरुण :** महाराज, मी इंजिनिअर आहे. नोकरी लागत नाहीये काही उपाय सुचवा
**ज्योतिषी :** कोणत्या शाखेचा इंजिनिअर आहेस, बाळा?
**तरुण :** इलेक्ट्रिकल्स्
**ज्योतिषी :** मग मला माहित नाही, कारण मी मेकॅनिकलचा आहे

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* आशियाई क्रिकेट परिषदेच्या अध्यक्षपदी कोणाची नियुक्ती झाली आहे?

\- शम्मी सिल्वा

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

अशा वेळी जंतुसंसर्ग होऊ नये म्हणून सहसा बालकाला स्वच्छ जागेत खेळायला ठेवून स्वच्छ धुतलेली खेळणी खेळण्यास द्यावी व बालन तोंडात कोणतीही वस्तू घालणार नाही, याकडे लक्ष ठेवावे.

ज्या व्याधीमध्ये स्मरणशक्ती व पूर्वी घेतलेल्या अनुभवांचा नाश होतो व स्मृती कमी होते. त्या व्याधीस अपस्मार असे म्हणतात. चरकाचार्यांनी स्मृतिनाशाबरोबरच बुद्धी व सत्त्व यांची विकृती होऊन विकृत हालचाली करीत रुग्ण मुर्च्छित हातो, त्याला अपस्मार असे म्हटले आहे. व्यावहारिक भाषेत यालाच झटके येणे, फेफरे येणे असे म्हणतात. जन्म होताना नकळत मेंदूला मार लागणे, शरीरातील साखरेचे प्रमाण कमी होणे, कॅल्शिअमची कमतरता असणे, मेंदूत ताप येणे, जंतुसंसर्ग जास्त प्रमाणात होणे, काम, भीती, क्रोध, शोक यांचा म

### बालकांचे आजार

नावर विकृत परिणाम होणे, मनोदोष वाढून रज व तम या गुणांची वाढ होणे, यामुळे अपस्मार व्याधी निर्माण होते. डोळ्यांसमोर अंधारी येणे, तोंडाला फेस येणे, शरीराच्या हालचालीत अचानक विकृती होणे, हातापायांच्या विक्षिप्त हालचाली करणे, मूर्च्छित होत असताना चित्रविचित्र दृश्य दिसणे, भुवया व डोळे यांच्या विचित्र हालचाली करणे, ज्या वेळी फेकरे येतात, त्या वेळी वर्तमान व भूतकाळ अशा दोन्ही वेळेचे ज्ञान नष्ट होणे होते.

बालक मुर्च्छित अवस्थेत पडते. हातांच्या मुठी आवळल्या जातात. श्वासावरोध होतो. ही अवस्था थोडा वेळ टिकते व बालक पुन्हा गाढ झोपी जाते. काही काळाने बाल पूर्ववत स्थितीला येते व असे फेफरे काही कालावधीच्या अंतराने बालकाला पुन्हा पुन्हा येऊ शकतात. ज्या वेळी झटका येतो, त्या वेळी बालकाला जवळच्या परिस्थितीचे भान न राहिल्याने अनेक स्वरुपाचे अपघात घडतात. म्हणून फेफरे येणाऱ्या बालकाला पाणी, आग, स्वयंपाक खोली, इतर यंत्रे व वाहन चालविणे यांपासून दूर ठेवावे.

झटका आला असताना बालकाची दातखिळी बसली असेल, तर ती मोकळी करावी. अपस्माराच्या झटक्यातून सावध करण्यासाठी तीक्ष्ण अंजन, धूप व नस्य यांचा उपयोग करावा.

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# हिंद सेवा मंडळाचे सचिव संजय जोशी हे अष्टपैलू व सर्जनशील व्यक्तिमत्व

### हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक

नगर – संजय जोशी हे अष्टपैलू आहेत. संस्थेच्या सर्व जबाबदाऱ्या, सामाजिक कार्य सांभाळून व्यवसायनिष्ठा जपत आहेत. शैक्षणिक क्षेत्रातील सर्जनशील व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली हिंद सेवा मंडळाचा प्रगतीचा आलेख चढता असून संस्थेला त्यांनी वेगळ्या उंचीवर नेले आहे. कायम नवनवीन संकल्पनांचे स्वागत करून त्या अमलात आणण्यासाठीही ते प्रयत्नशील असतात. हिंद सेवा मंडळाच्या शहरातील व तालुक्यांमधील सर्व शैक्षणिक इमारतींचे अद्यावत नूतनीकरणासाठी त्यांचे प्रयत्न सुरु आहेत. त्यास लवकरच कार्यारंभ होईल, असे प्रतिपादन हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक यांनी केले.



हिंद सेवा मंडळाचे सचिव संजय जोशी यांचा मानपत्र देऊन विशेष सत्कार करताना संस्थेचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक.

हिंद सेवा मंडळाच्या संचालक मंडळाची ३ मे रोजी झालेल्या बैठकीत वादावादीवरून संस्थेचे मानद सचिव संजय जोशी यांनी राजीनामा दिला होता. मात्र संचालक मंडळाने विशेष सभेत एकमताने जोशींचा राजीनामा नामंजूर केला होता. त्यानंतर संजय जोशी यांनी मनाचा मोठेपणा दाखवत पुन्हा मानद सचिव पदाचा कारभार हातात घेतल्याबद्दल अहिल्यानगर शहरातील व मिरजगाव येथील सर्व शैक्षणिक संस्थांच्यावतीने मानपत्र देऊन संजय जोशी यांचा विशेष सत्कार नुकताच करण्यात आला. यावेळी अध्यक्षस्थानातून प्रा.मोडक बोलत होते. यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. रमेश झरकर, माजी कार्याध्यक्ष अ‍ॅड.अनंत फडणीस, सत्कार समितीचे निमंत्रक अजित बोरा, पेमराज सारडा महाविद्यालयाचे चेअरमन डॉ. पारस कोठारी, संचालक जगदीश झालानी, प्रा.ज्योती कुलकर्णी, अनंत देसाई, अनिल देशपांडे, प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित आदींसह सर्व शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते.

सत्कारास उत्तर देताना संजय जोशी म्हणाले, २००० साली हिंद सेवा मंडळाच्या निवडणुकीत मला शेवटच्या क्षणी तिकीट नाकारण्यात आले होते. मात्र खचून न जाता २००५ साली पूर्ण नियोजनाने निवडणुकीची तयारी केली व बिनविरोध निवडून येत संजय जोशी काय आहे हे सर्वांना दाखवून दिले. तेव्हापासून संस्थेच्या हित व प्रगतीसाठी प्रयत्नशील आहे. बदलत्या काळाबरोबर चालत अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त व सर्व सोयीसुविधांयुक्त शिक्षण विद्यार्थ्यांना मिळावे यासाठी संस्था कटीबद्ध आहे. पदाधिकाऱ्यांनी घेतलेल्या महत्वच्या निर्णयानुसार लवकरच सर्व जुन्या इमारतींचे नूतनीकरण व संस्थेची नवी भव्य प्रशासकीय इमारत उभारण्यात येणार आहे. हिंद सेवा मांडळाच्या पदाधिकाऱ्यांनी, सर्व प्राध्यापकांनी व शिक्षकांनी माझ्यावर मोठे प्रेम व्यक्त करत केलेल्या सत्कारामुळे मी भारावून गेलो आहे.

कार्याध्यक्ष डॉ.रमेश झरकर म्हणाले, हिंद सेवा मंडळाच्या जडणघडणीत संजय जोशी यांचा मोलाचे योगदान आहे. वडील दादा जोशी यांचा वारसा ते उत्तमप्रकारे पुढे चालवत संस्थेची चौफेर प्रगती करत आहेत.

अजित बोरा म्हणाले, संस्थेचे सचिव म्हणून काम करतना संजय जोशी यांनी कोणालाही दुखावले नाही. सर्वांना कायम सहकार्य केले असल्याने सर्व शिक्षक, प्राध्यापक त्यांच्यावर खुप खुश आहेत.

डॉ.पारस कोठारी म्हणाले, हिंद सेवा मंडळाच्या शैक्षणिक कार्यात संजय जोशी यांनी स्वतःला वाहून घेतले आहे. त्यामुळे ते निः स्वार्थपणे संस्थेच्या प्रगतीसाठी मोठे योगदान देत असल्याने त्यांच्या कार्याचाच हा गौरव आहे.

यावेळी अ‍ॅड.अनंत फडणीस, अनंत देसाई, जगदीश झालानी यांच्यासह उपस्थित सर्व मुख्याध्यापकांनी संजय जोशींचे कौतुक करणारे विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे स्वागत आदिनाथ जोशी यांनी केले. प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित यांनी प्रास्ताविक केले. सहाय्यक सचिव बी. यू. कुलकर्णी यांनी आभार मानले. प्रा.प्रसाद बेडेकर यांनी सूत्रसंचालन केले.

यावेळी वैशाली जोशी, ज्येष्ठ सदस्य शरद गोखले, शरद लोंढे, मोहन कुकरेजा, प्रवीण भंडारी, प्रशांत कुलकर्णी, भरत कुंकूलोळ आदींसह अहिल्यानगर शहर व मिरजगाव येथील संस्थेच्या शाळेचे सर्व मुख्याध्यापक, शिक्षक उपस्थित होते.

# अखंड गवळी समाज आयोजित महाकाय चषक क्रिकेट स्पर्धेत शिवशंकर वॉरियर्स विजेता तर स्वामी समर्थ स्ट्राईकर्स उपविजेता

नगर – वाडिया पार्क मैदानावर अखंड गवळी समाज व आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित महाकाय चषक क्रिकेट स्पर्धा उत्साहात झाली.

यावेळी माजी आमदार अरुणकाका जगताप यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. या स्पर्धेचे विजेतेपद शिवशंकर वारियर्स संघाने पटकावले तर उपविजेतेपद स्वामी समर्थ स्ट्राईकर्स संघाला मिळाले, या दोन्ही संघांमधील सामना चुरशीचा झाला, तर तृतीय पारितोषिक सम्राट किंग इलेव्हन व उत्तेजनार्थ पारितोषिक मुंजोबा वॉरियर्स संघाने पटकविले. तसेच या स्पर्धेतील मॅन ऑफ द मॅच, मॅन ऑफ द सिरीज, बेस्ट बॉलर व बेस्ट बॅट्समन राहुल नागापुरे या खेळाडूला पारितोषिक देण्यात आले असल्याची माहिती प्रकाश भागानगरे यांनी दिली.



अखंड गवळी समाज आयोजित महाकाय चषक क्रिकेट स्पर्धेत शिवशंकर वॉरियर्स विजेता तर स्वामी समर्थ स्ट्राईकर्स उपविजेता संघ ठरले. (छाया – लहू दळवी)

अखंड गवळी समाज आयोजित महाकाय चषक क्रिकेट स्पर्धेचे पारितोषिक वितरण गुणे आयुर्वेदिक कॉलेजचे अध्यक्ष सचिन जगताप यांच्या हस्ते झाले. यावेळी माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे, संतोष गेनाप्पा, दत्तात्रय भागानगरे, दत्ता खैरे, निलेश निस्ताने, ऋषिकेश गोंधळे, रोहित टोकेफळकर, बाली बांगरे, अक्षय नामदे, चंद्रकांत औशीकर, निलेश खताडे, सुनील लालबेंद्रे, किशोर नामदे, गौरव हरबा, सागर चवंडके, भगवान कुरधने आदी उपस्थित होते

आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगामध्ये टीव्ही, मोबाईल या साधनांमुळे युवा पिढी मैदानी खेळापासून लांब चालली आहे, विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणाबरोबरच आपल्या आवडीच्या खेळाचे धडे देणे गरजेचे आहे, आता विविध क्रीडा क्षेत्रामध्ये देखील करिअर करण्याच्या विविध संधी उपलब्ध आहे, खेळामुळे मनुष्याचे आरोग्य सदृढ व निरोगी राहण्यास मदत होत असते, अखंड गवळी समाजाने एकत्रित येऊन एकतेचे दर्शन घडविण्याचे काम केले असल्याचे मत सचिन जगताप यांनी व्यक्त केले.

गवळी समाजातील युवकांनी एकत्रित येऊन वाडिया पार्क मैदानावर महाकाय चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करून सांघिकतेचे दर्शन घडवले आहे. या माध्यमातून युवक आपल्या विचारांची देवाणघेवाण करत असतात क्रीडा स्पर्धेच्या माध्यमातून चांगले विचार निर्माण होत असतात क्रीडा स्पर्धेच्या माध्यमातून युवक घडला जात असल्याचे मत संतोष गेनाप्पा यांनी व्यक्त केले.

# विद्यार्थ्यांचे यश समाजासाठी सकारात्मक गोष्ट

### बाळासाहेब हुच्चे यांचे प्रतिपादन; पवन नागरी सहकारी पतसंस्थेच्यावतीने सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा सत्कार

नगर – स्पर्धेचे युग असल्याने विद्यार्थ्यांनी त्याप्रमाणे नियोजन करुन मार्गक्रमण केले पाहिजे. एक–एक मार्काला महत्व आल्याने विद्यार्थ्यांनी अभ्यास करणे गरजेचे आहे. १० वी व १२ वी परिक्षेत गेल्या काही वर्षांपासून विद्यार्थ्यांचे यशस्वी होण्याची प्रमाण मोठे आहे, ही समाजासाठी सकारात्मक गोष्ट आहे. या गुणवंतांचा सत्कार करुन त्यांच्या शैक्षणिक कार्यास प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न पतसंस्थेच्या माध्यमातून केला जात आहे. पतसंस्थेच्या माध्यमातून सभासदांची आर्थिक पत सुधारण्याबरोबरच त्यांच्या गुणवंत पाल्यांना शिक्षण घेतांना अडचण येऊ नये यासाठी मदतीचा हात देण्यात येतो. गुणवंत पाल्य हे पतसंस्थेचा अभिमान आहे, असे प्रतिपादन चेअरमन बाळासाहेब हुच्चे यांनी केले.



पवन नागरी सहकारी पतसंस्थेच्यावतीने सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा सत्कार करण्यात आला.

पवन नागरी सहकारी पतसंस्थेच्यावतीने सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी चेअरमन बाळासाहेब हुच्चे, व्हाईस चेअरमन मनोज क्षिरसागर, संचालक किरण धारक, दत्तात्रय डोळसे, निशिकांत शिंदे, प्रसाद शिंदे, संजय धोकरिया, अर्चना काळे, आशा चौरे, अभय काळे, दिपक भागवत, अ‍ॅड. विनायक दारुणकर, अ‍ॅड.संदिप पडोळे, मधुरा जोधी, नंदकुमार गुरसाळे, सागर सातपुते उपस्थित होते.

यावेळी दुर्गेश काळे, श्रेया धारक, अर्थव हुच्चे, विशे धोकरिया, मानसी चौरे, सोहम गुरसाळे, अभिषेक पडोळे, यश कोटकर आदिंचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी मनोज क्षिरसागर म्हणाले, पतसंस्थेच्या माध्यमातून सभासद, कर्जदार, ठेवीदार यांच्या प्रगतीसाठी विविध योजना सुरु करण्यात आल्या आहेत. त्याच बरोबर विविध उपक्रमातून सामाजिक दायित्वही जपले जाते. आज सभासदांच्या गुणवंत पाल्यांनी मिळविलेले यश हे कौतुकास्पद असेच आहे. त्यांचा सत्कार केल्याने इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळणार आहे. सूत्रसंचालन निशिकांत शिंदे यांनी केले. प्रसाद शिंदे यांनी आभार मानले.

# भारतीय बौद्ध महासभा आयोजित १० दिवशीय बौद्धाचार्य श्रामणेर शिबीर सांगता समारोप उत्साहात

नगर – भारतीय बौद्ध महासभा अहिल्यानगर जिल्हा दक्षिण अंतर्गत नगर तालुक्याच्या वतीने २८ मे ते ६ जून अखेर १० दिवशीय बौद्धाचार्य श्रामणेर शिबीर आयोजित केले होते. त्याचा सांगता समारोप डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक न्यू टिळक रोड, अहिल्यानगर या ठिकाणी ६ जून रोजी नगर तालुक्याचे संस्कार उपाध्यक्ष आयु. विशाल बाबासाहेब पवार यांचे अध्यक्षतेखाली झाले. राष्ट्रीय महासचिव भारतीय बौद्ध महासभा संस्थेचे भंते ए. सुमेध बोधीजी यांनी शिबिरार्थी व उपस्थित उपासक, उपासिका यांना त्रिशरण पंचशील दिले. तदनंतर नगर तालुक्याच्या वतीने भंते सुमेध बोधी जी, केंद्रीय शिक्षक ए. जे. तायडे गुरुजी जिल्हा कार्यकारणी तालुका कार्यकारणी अशा सर्व उपस्थितांचा नगर तालुक्याच्या वतीने सन्मान पत्र व गुलाब पुष्प देवून सन्मान करणेत आला. त्यानंतर ज्या श्रामणेर शिबिरार्थीने १० दिवस प्रशिक्षण घेतले अश्या शिबिरार्थीचे मनोगत झाले. मनोगतामधून पूर्वश्रमीचा व्यक्ती व १० दिवसांमध्ये जे घडलो त्याचे व डॉ. बाबासाहेब आंबेडकर व आंबेडकर घराणे बौद्ध धम्म व धम्माचा प्रचार, प्रसार व संस्थेविषयी आपल्या मनोगतामधून संस्थेविषयी आपण सक्रिय काम करू असे आश्वासन दिले.

अहिल्यानगर जिल्हा सरचिटणीस आयु. सतिष ओहोळ, संस्कार उपाध्यक्ष व माजी जिल्हा अध्यक्ष आयु. भगवंत गायकवाड यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चळवळ धम्म आणि धम्माचा प्रचार व प्रसार आणि संस्थेविषयी एकनिष्ठ राहण्याचे आवाहन केले.

केंद्रीय शिक्षक ए.जी. तायडे गुरुजी यांनी तथागत भगवान गौतम बुद्ध यांचे जीवन चरित्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर चळवळ व आंबेडकर घराणे आणि संस्थेविषयी मार्गदर्शन केले. धम्म हा विज्ञान वादी आहे. असे मार्गदर्शन केले. भंते ए. सुमेध बोधी यांनी तद्नंतर उपस्थितांना धम्म देसना दिली. आशीर्वाद गाथा घेवून सरणतंय घेण्यात आले.



भारतीय बौद्ध महासभा अहिल्यानगर जिल्हाअंतर्गत आयोजित बौद्धाचार्य श्रामणेर शिबीराची सांगता झाली.

शिबीर यशस्वीतेकरिता नगर तालुका अध्यक्ष आयु. नितीन शिवाजी साळवे व सरचिटणीस आयु. अविनाश धोंडिबा राक्षे यांनी परिश्रम घेतले. कोषाध्यक्ष आयु. सुभाष कांबळे, संस्कार उपाध्यक्ष विशाल पवार, उपाध्यक्ष प्रचार पर्यटन, आयु. अंकुश गायकवाड, आयु. अरुण गायकवाड, संस्कार सचिव आयु. प्रकाश कांबळे, आयु.विशाल गायकवाड, उपाध्यक्ष संरक्षण आयु. अमोल गायकवाड, कार्यालयीन सचिव आयु. सनी गायकवाड, सचिव प्रचार पर्यटन आयु. गौतम हंबर्डे, आयु. बाबासाहेब धिवर, सचिव संरक्षण आयु.सुनील पंचमुख, आयु.संजय केदारे, आयु. संतोष जाधव, आयु. हाबू शिंदे, आयु. मिलिंद आंग्रे, आयु. विजितकुमार ठोंबे, आयु. सुनील पंचमुख, आयु.सुनील गायकवाड, आयु. गणेश हंबर्डे, आयु. परमेश्वर गायकवाड, आयु. संतोष गायकवाड, समता सैनिक दिपक गायकवाड, धम्म सेवक दिपक मेढे यांनी परिश्रम घेतले. त्यांना अहिल्यानगर जिल्हा संघटक तथा नगर तालुका प्रभारी आयु. धोंडिबा राक्षे सर यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच संरक्षण जिल्हा उपाध्यक्ष आयु.संतोष गायकवाड, संरक्षण सचिव आयु. किशोर कांबळे, आयु. गोरख केदारे यांनी शिबीर यशस्वी करणे करिता प्रयत्न केले.

माजी तालुका अध्यक्ष व केंद्रीय शिक्षक, संस्कार सचिव नगर तालुका आयु. प्रकाश कांबळे व जेष्ठ बौद्धाचार्य आयु. दिपक अमृत यांनी सूत्रसंचालन केले.

शिबीर सांगता समारंभास जिल्हा कार्यकारिणी तसेच शेवगाव तालुका प्रभारी व जिल्हा संघटक माधव चाबुकस्वार, कायदेशीर सल्लगार आयु. राहुल कांबळे, केंद्रीय शिक्षक अण्णा साहेब गायकवाड व जिल्हा कार्यकारिणी उपस्थित होते. अहिल्यानगर शहराध्यक्ष बौद्धाचार्य दिपक पाटोळे, सरचिटणीस आयु. गौतम पाचारणे, संस्कार उपाध्यक्ष, आयु. लक्ष्मण माघाडे व कार्यकारिणी हे उपास्थित होते. केंद्रीय शिक्षक आयु. राम गायकवाड व हिंदी भाषिक केंद्रीय शिक्षिका आयु. अर्चनाताई गायकवाड कार्यक्रमाच्या शिबिरार्थीचे चिवर उतरवून शुभ्र वस्त्र नातेवाईक यांनी आणलेले परिधान करण्यात आले. भंते सुमेध बोधी यांनी पंचशील देवून व प्रशिक्षणार्थीना प्रमाणपत्र तालुक्याच्या वतीने देण्यात आले. नगर तालुका अध्यक्ष आयु.नितीन शिवाजी साळवे यांनी आभार मानून या शिबिराचे संपूर्ण जिल्हा भरातून कौतुक करण्यात येत आहे.



न्युरॉन प्रीस्कूलमध्ये शाळेच्या पहिल्या दिवशी शिक्षिकांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले.

# न्युरॉन प्रीस्कूलमध्ये शिक्षिकांनी केले विद्यार्थ्यांचे स्वागत

नगर – मे महिन्याच्या उन्हाळी सुट्टीनंतर शाळेच्या पहिल्या दिवसाची वाट जसे विद्यार्थी व पालक आतुरतेने पाहत असतात तसेच त्यांचे शिक्षकही त्यांच्या स्वागतासाठी कुतुहलाने सज्ज असतात.

पूर्व प्राथमिक शाळेचा पहिला दिवस हा अनेक विद्यार्थ्यांसाठी व त्यांच्या पालकांसाठी शिक्षणाच्या दिशेने अतिशय महत्त्वाचा व अविस्मरणीय टप्पा असतो.

मुलांच्या सर्वांगिण विकासासाठी मुलांनी वेळेवर व नियमित शाळेत येणे, निरनिराळ्या कलाकृतीत भाग घेणे, विविध प्रकारचे खेळांमध्ये भाग घेणे आवश्यक आहे. तसेच न्युरॉन प्रीस्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकास व त्यांच्या मानसिक व शारीरिक विकासाचा परिपूर्ण विचार केला जातो. या शाळेत खेळीमेळीच्या वातावरणात मुलं शिक्षण घेतात, असे प्रतिपादन प्राचार्या डॉ.सौ. संगीता मिसाळ यांनी केले.

शाळेच्या पहिल्या दिवशी सौ. श्रुति जोशी व सौ. रनिता रच्चा या शिक्षिकांनी मुलांचे औक्षण करून स्वागत केले. दामिनी मिसाळ यांनी मुलांशी व पालकांशी सुसंवाद साधला तर शाळेच्या कोऑर्डिनेटर सौ. कविता शिंदे व सौ. स्वाती डोंगरे यांनी शाळेच्या सजावटीचे काम बघितले. तसेच सौ. रिया कल्याणी व नेहा पारिक यांनी मुलांना भेटवस्तु व खाऊचे वाटप केले. निरनिराळ्या ॲक्टिव्हिटीच्या माध्यमातून मुलांना आनंदी वातावरणात मंत्रमुग्ध केले.

पालकांनीही अतिशय उत्साहात मुलांचे सेल्फी पॉईंटवर फोटो काढले.

# एअर पिस्तुल शुटिंग स्पर्धेत इन्फिनिटी शुटिंग ॲकॅडमीच्या खेळाडूचे यश

नगर – नगरमधील इन्फिनिटी शुटिंग ॲकॅडमी येथे प्रशिक्षण घेणाऱ्या ३ खेळाडूचे महाराष्ट्र राज्य १० मीटर्स एअर पिस्तूल शूटिंग स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. मुंबई येथे नुकत्याच पार पडलेल्या २८व्या कॅप्टन एस. जे. एझेकिएल शूटिंग स्पर्धेमध्ये इन्फिनिटी शूटिंग अकादमी, अहिल्यानगर येथील तीन खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत प्री–नॅशनल स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे. ही प्री–नॅशनल स्पर्धा ऑगस्ट महिन्यात होणार आहे.

पात्र खेळाडूंची नावे आणि गुण: १. दक्ष ध्रुव नासिर – ३४० गुण (ते मागील वर्षी देखील नॅशनलसाठी पात्र होते), २. अथर्व गणेश पुंड – ३५७ गुण, ३. तेजस पोटे – ३४१ गुण

**इन्फिनिटी शूटिंग अकादमीचे तीन खेळाडू प्री–नॅशनल स्पर्धेसाठी पात्र**



दक्ष ध्रुव नासिर | अथर्व गणेश पुंड | तेजस पोटे

हे सर्व खेळाडू इन्फिनिटी शूटिंग अकादमीचे विद्यार्थी असून त्यांनी इंडियन नॅशनल प्लेयर सागर फाटके सर यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने सराव व प्रशिक्षण घेतले.

इन्फिनिटी शूटिंग अकादमीचे संस्थापक लि. कर्नल ध्रुव (निवृत्त) आणि हरीश नय्यर यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे, ही कामगिरी आमच्या अॅकॅडमीच्या गुणवत्तापूर्ण प्रशिक्षणाचे फलित आहे. आमच्या खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर चमकावे, हाच आमचा उद्देश आहे.

ॲकॅडमीने अल्पावधीत अहिल्यानगरमध्ये नेमबाजी क्षेत्रात महत्त्वाची ओळख निर्माण केली आहे. भविष्यात आणखी अनेक खेळाडूंना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर घडवण्याचा मानस संस्थापकांनी व्यक्त केला.





गुरु गोरक्षनाथ प्रतिष्ठानचे संस्थापक गोकुळ नाना आठरे पाटिल यांच्या अहिल्यानगरच्या सावेडी येथील कार्यालयाला पर्यटन मंत्री शंभुराज देसाई यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी आमदार विठ्ठलराव लंघे, बाजीराव चव्हाण, गोकुळ नाना आठरे पाटिल आदि उपस्थित होते. तसेच गोरक्षकांच्या समस्या जाणून घेऊन त्यावर चर्चा करण्यात आली.



जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून सेवानिवृत्त होत असलेल्या वनमजुरांनी भांडेवाडी (ता. कर्जत) या निसर्गरम्य परिसरात वृक्षारोपण केले.

# वनमजुरांच्या सेवापूर्तीचा सोहळा रंगला वृक्षारोपणाने

## सेवानिवृत वनमजुरांचे भांडेवाडीला वृक्षारोपण, कर्जत-जामखेड वनक्षेत्रातील वन मजूरांच्या सेवापूर्तीचा अनोखा सोहळा

नगर – जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून सेवानिवृत्त होत असलेल्या वनमजुरांनी भांडेवाडी (ता. कर्जत) या निसर्गरम्य परिसरात वृक्षारोपण केले. वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धनाचा संदेश देवून हा सेवापूर्तीचा कार्यक्रम रंगला होता.

कर्जत-जामखेड वनक्षेत्रातील वन मजूरांचा यावेळी सन्मान करण्यात आला. वनपरिक्षेत्र अधिकारी मोहन शेळके व कर्मचारी वर्ग यांच्यावतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जामखेड वनविभागामध्ये गेल्या ३५ ते ४० वर्षापासून ज्या वनमजुरांनी प्रामाणिकपणे काम केलं अशा ५ वनमजुरांचा सेवापूर्तीचा सोहळा पार पडला. यामध्ये सेवानिवृत्त वनकर्मचारी ताहेर अली सय्यद, बापू उमराव जायभाय, अशोक नामदेव काकडे, श्रीमती अन्नपूर्णा पवार, शंकर सोपान बाराते यांचा सपत्निक सत्कार करण्यात आला. वनमजुर देखील वन विभागाने राबविलेल्या सेवापूर्तीच्या आगळ्या-वेगळ्या कार्यक्रमाने भारावले.

पर्यावरणाला वाचवण्यासाठी वन मजूर मोठी भूमिका बजावत आहेत, २०१० पासून वनमजुरांची भरती रखडलेली आहे. सेवेत असलेल्या वनमजुरांना त्यामुळे कामाचा मोठा ताण येत आहे. म्हणून ही भरती लवकरात लवकर करावी, जेणेकरून वनमजुरांना हातभार लागेल आणि पर्यावरण संवर्धनासाठी आणखी मोठे काम करता येईल, अशी मागणी वन मजुरांनी केली.

या कार्यक्रमासाठी सातत्याने पर्यावरण संवर्धनासाठी कार्यरत असलेल्या कृष्णाली फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांना आमंत्रित करण्यात आले होते. कृष्णाली फाउंडेशनचे अध्यक्ष प्रशांत पाटील शेळके वनमजुरांचा वृक्षारोपणाने झालेली सेवानिवृत्तीचा कार्यक्रम प्रेरणादायी आहे. आपल्या सेवाकाळात पर्यावरण रक्षणाचे काम केलेले वनमजुर वृक्षारोपणाने सेवानिवृत्त होत असल्याचा त्यांना देखील अभिमान राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी जामखेड वनपाल प्रवीण उबाळे, कर्जत वनपाल सुरेश भोसले, वनरक्षक रवी राठोड, वनरक्षक शांतिनाथ सपकाळ, वनरक्षक नागेश तेलंगे, वनरक्षक गंगासागर गोटमुकले, वनरक्षक चित्रा आदींसह कार्यालयातील किसन नजन, शिवाजी चिलगर, श्यामराव डोंगरे, विठ्ठल जान गवळी, राघू सुरवसे आदी वनकर्मचारी उपस्थित होते.

# वृक्षारोपण व संवर्धन ही एक सामाजिक सेवा

## सोपानराव पालवे यांचे प्रतिपादन; कोल्हार व उदरमल रस्त्यालगत वृक्षारोपण



वृक्षारोपण अभियानाप्रसंगी कोल्हार गावचे सोपानराव पालवे, सामाजिक वनीकरण विभागाचे (पाथर्डी) वनपाल विजय जावळे, ह.भ.प. राम महाराज घुले आदी.

नगर – वृक्षारोपण व संवर्धन ही एक सामाजिक सेवा असून, यामुळे निसर्गाचा समतोल साधला जाणार आहे. जय हिंद फाऊंडेशनने जिल्ह्यातील पर्यावरण चळवळीला गती देवून मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण घडवून आणले आहे. वृक्ष बँक सारखे प्रकल्प राबवून वर्षभर सुरु असलेली त्यांची निस्वार्थ सेवा प्रेरणादायी असल्याचे सोपानराव पालवे यांनी सांगितले.

वर्षभर वृक्षारोपण व संवर्धनाची मोहिम राबविणारे जय हिंद फाउंडेशन व सामाजिक वनीकरण विभाग (पाथर्डी) यांच्या संयुक्त विद्यमाने कोल्हार व उदरमल रस्त्यालगत वृक्षारोपण करण्यात आले. ग्रामीण भागातील रस्त्यांचा दुतर्फा झाडांची लागवड करण्याच्या उद्देशाने जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून हा उपक्रम घेण्यात आला.

या वृक्षारोपण अभियानाप्रसंगी कोल्हार गावचे सोपानराव पालवे, सामाजिक वनीकरण विभागचे (पाथर्डी) वनपाल विजय जावळे, ह.भ.प. राम महाराज घुले, निवृत्त पोलीस अधिकारी बाबाजी पालवे, जय हिंदचे शिवाजी पालवे, शिवाजी गर्जे, ॲड. संदीप जावळे, रामकिसन पालवे, संदिप पालवे, सत्यवान घुले, पप्पू पालवे आदी उपस्थित होते.

ह.भ.प. राम महाराज घुले म्हणाले की, संत तुकाराम महाराज यांनी सांगितल्याप्रमाणे वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे प्रत्येक व्यक्तीने वृक्षारोपण मध्ये सहभाग घेणे गरजेचे आहे. भविष्यात पावसाचे प्रमाण कमी होत चालले असून, त्यामुळे वाढते तापमान, अवकाळी पाऊस, दुष्काळ परिस्थिती या नैसर्गिक संकटांना तोंड द्यावे लागत आहे. प्रत्येक व्यक्तीने वृक्ष क्रांती चळवळीमध्ये सहभाग घेतला तर ग्लोबल वॉर्मिंगचा प्रश्न सुटून बळीराजा सुखावेल आणि धरतीवर आनंद निर्माण होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तर जय हिंदच्या वृक्षारोपण व संवर्धन चळवळीत सक्रीयपणे सहभागी होण्याचे व या चळवळीला हातभार लावण्याचे आवाहन केले.

# वृक्ष संवर्धनाचा संकल्पाने पर्यावरण दिवस साजरा



निमगाव वाघा येथे स्व.पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ व धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्यावतीने जागतिक पर्यावरण दिवस वृक्षारोपणाने साजरा करण्यात आला.

नगर – नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथे स्व.पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ व धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्यावतीने जागतिक पर्यावरण दिवस वृक्षारोपणाने साजरा करण्यात आला.

संत शिरोमणी सावता महाराज मंदिर परिसरात वृक्षारोपण करुन पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. यावेळी डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै.नाना डोंगरे, चंद्रकांत जाधव, डॉ. विजय जाधव, बाबूराव जाधव, बबन जाधव, विशाल निमसे, युवा मंडळाचे अध्यक्ष पै. संदीप डोंगरे, संजय जाधव, डॉ. संदीप जाधव, लक्ष्मण चौरे, सुरेश जाधव, जयंत जाधव आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

ग्रामस्थांनी लावलेली झाडे जगविण्यासाठी वृक्षसंवर्धनाचा संकल्प घेतला.

या उपक्रमासाठी मेरा युवा भारत अहिल्यानगरचे जिल्हा युवा अधिकारी सत्यजीत संतोष, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे व महाराष्ट्र राज्य ग्रंथालय विभागाचे संचालक अशोक गाडेकर यांचे मार्गदर्शन लाभले.

# निंबळक विद्यालयात 'एक विद्यार्थी एक झाड' या उपक्रमाला सुरुवात



निंबळक विद्यालयातील विद्यार्थ्यांकडून वृक्षारोपण करण्यात आले.

नगर – तालुक्यातील इसळक – निंबळक येथील माध्यमिक विद्यालयातील नुकत्याच मुख्याध्यापिका पदावर विराजमान झालेल्या संगीता जाजगे यांनी आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर शैक्षणिक, सामाजिक, आरोग्य विषयक तसेच पर्यावरण संवर्धन विषयक विविध उपक्रम विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांच्या सहकार्यातून राबविण्याचा निर्णय घेतला. त्याचाच एक भाग म्हणून पर्यावरण संवर्धनाबाबत सर्व विद्यार्थी जागृत व्हावेत या हेतूने त्यांनी विद्यालयातील विद्यार्थ्यांना जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आपल्या घराजवळ कमीत कमी एक झाड लावून त्याचे संगोपन वर्षभर करण्याचे आवाहन शाळेच्या वर्ग निहाय असलेल्या व्हॉटस्प ग्रुप वर केले. झाड लावल्यावर त्याचा फोटो व्हॉटस्ॲप द्वारे आपआपल्या वर्ग शिक्षकांना १५ जूनपर्यंत टाकण्यास सांगीतले आहे. याला विद्यार्थी व पालकांकडून प्रतिसाद मिळत असून अनेक झाडांची लागवड या निमित्ताने विद्यार्थ्यांकडून झाली असून जे विद्यार्थी कमीत कमी एक झाड लावून त्याचे वर्षभर संगोपन करतील त्यांना कार्यानुभव या विषयांतर्गत उपक्रमाला १० गुण देण्याचे विद्यालयाकडून सांगण्यात आले आहे. वर्षअखेरीस त्याची पाहणी केल्यानंतर विद्यार्थ्यांना गुणदान केले जाणार आहे.

या अनोख्या कल्पनेमुळे मुख्याध्यापिका संगीता जाजगे यांचे ग्रामस्थांकडून प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष अभिनंदन व कौतुक होत असून प्रत्येकाकडून त्यांना सहकार्य करण्याची भावना व्यक्त होत आहे.

यासाठी विद्यालयातील विलास कोतकर, प्रताप बांडे, ज्ञानदेव गायकवाड, सुभाष होळकर, नजीर शेख, शांता कोतकर, मारुती कोतकर, भुतारे, ताकवले, चौधरी, डहाळे, सुर्यवंशी, लांडे, म्हस्के, खंडागळे, कोतकर व्ही. एस., कोतकर बी.ए., संजय गेरंगे, आळंदीकर, घोलप, मुठे, दळवी, गोत्राळ आदि शिक्षक व शिक्षकेतर सेवकवृंद विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत आहेत. विद्यालयाकडून पर्यावरण संवर्धन विषयक चांगला उपक्रम हाती घेण्यात आल्याबद्दल संस्थाध्यक्ष नितीन कोतकर व संस्थेच्या इतर सर्व पदाधिकाऱ्यांकडून आनंद व्यक्त होत आहे.

# शरीफराजे भोसले यांच्या समाधी परिसरात वृक्षारोपण

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त उमेद सोशल फाउंडेशन व ईएचएच प्रा.लि. चा उपक्रम



जागतिक पर्यावरण दिनानिमित्त उमेद सोशल फाउंडेशन व ईएचएच प्रा.लि.ने नगर तालुक्यातील भातोडी पारगाव येथे शरीफराजे मालोजीराजे भोसले यांच्या समाधी परिसरात वृक्षारोपण अभियान राबविण्यात आले.

नगर – नगर तालुक्यातील भातोडी पारगाव येथे शरीफराजे मालोजीराजे भोसले यांच्या समाधी परिसरात जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण अभियान राबविण्यात आला. उमेद सोशल फाउंडेशन व ईएचएच प्रा.लि. यांच्या वतीने सुरु असलेल्या पर्यावरण संवर्धन सप्ताहातंर्गत हा उपक्रम राबविण्यात आला.

उपक्रमाची सुरुवात शरीफराजे भोसले यांच्या समाधीला पुष्पहार अर्पण करून, अभिवादनाने करण्यात आली. गावचे सरपंच विक्रम गायकवाड यांनी उमेद सोशल फाउंडेशन व ईएचएच प्रा.लि. ने घेतलेल्या उपक्रमाचे कौतुक करुन पर्यावरण संवर्धनासाठी सर्वांचा पुढाकार महत्त्वाचा आहे. सामाजिक कार्याबरोबरच पर्यावरणाच्या प्रश्नासाठी उमेदचे कार्य प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

या अभियानातंर्गत भातोडी गावात २०० झाडांची लागवड करण्याचा निर्धार करण्यात आला. फाउंडेशनचे सल्लागार ॲड. दिपक धीवर यांनी भविष्यातील संघटनेची वाटचाल व सामाजिक कार्याची माहिती दिली.

फाउंडेशनचे अध्यक्ष अनिल साळवे म्हणाले की, निसर्ग वाचवला तरच भविष्यात मानव सुरक्षित राहील. आपल्याला निसर्ग फक्त वापरण्यापुरता नाही, तर त्याचे संवर्धन करण्याचीही जबाबदारी आहे. आज आपण येथे २०० झाडे लावण्याचा संकल्प घेतला आहे. परंतु हे फक्त सुरुवात आहे. या झाडांची निगा राखणे, त्यांना जगवणे हेच खरी जबाबदारी राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाप्रसंगी फाउंडेशनचे सचिव सचिन साळवी, सल्लागार ॲड. दिपक धीवर, सोशल मिडियाचे विजय लोंढे, प्रकाश भालेराव, ईएचएच प्रा.लि.चे सीईओ दिपक ढवळे, सदस्य कैलास गांगर्डे, शाकिर मुलानी, जालिंदर लबडे, आदीनाथ शिंदे, दिलीप अरणकल्ले, अशोक होळकर, विठ्ठल कुचे, राजेंद्र काळे, अरुण घोलप, संतोष कदम, शामराव लबडे, विलास लबडे, गणपत शिंदे, घनश्याम लबडे, ॲड. दिपक कदम आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते. या उपक्रमासाठी उमेदचे उपाध्यक्ष कुणाल तनपुरे, खजिनदार संजय निर्मळ, जय असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. महेश शिंदे व वनरक्षक विजय चेमटे यांचे मार्गदर्शन लाभले.



दुसरे बालपण स्पर्धेमध्ये ओंकार संगीत निकेतन, भिंगारला प्रथम पारितोषिक मिळाले.

# दुसरे बालपण स्पर्धेत ओंकार संगीत निकेतनला प्रथम पारितोषिक

नगर – नुकत्याच झालेल्या मानकन्हैया ट्रस्टच्या दुसरे बालपण स्पर्धेत भिंगार येथील ओंकार संगीत निकेतनला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले. यामध्ये गोविंद बल्लाळ देवल लिखित संगीत शारदामधील चैत्रगौरी हळदी कुंकवाचा नाट्यप्रवेश सादर करण्यात आला होता. यातील भूमिका जान्हवी – सुलोचना दळवी, मंदाकिनी – वनिता दहिवाले, शरयू – छाया खोसे, तुंगा – जयश्री वराडे, त्रिवेणी – निला बोरकर, शारदा – रूपाली परदेशी यांनी उत्तमरित्या साकारल्या. तर वल्लरीची भूमिका विद्यालयाच्या संचालिका सौ. संगीता देऊळगांवकर यांनी साकारली. त्यांना तबल्याची उत्कृष्ट अशी साथ प्रसाद सुवर्णपाठकी तर संवादिनीची साथ ओंकार देऊळगांवकर यांनी केली. अनिकेत देऊळगांवकर यांनी या नाट्यप्रवेशाचे दिग्दर्शन केले.

स्पर्धेचे परीक्षण नृत्यगुरूवर्या सुरेखा डावरे, अभिनेते देवीप्रसाद सोहनी आणि शास्त्रीय गायक अभिजीत अपस्तंभ यांनी केले. या कार्यक्रमाला ज्येष्ठ कवी चंद्रकांत पालवे, बलभीम पठारे, प्रसाद बेडेकर, चंद्रकांत पंडित, नंदकुमार देशपांडे, प्रशांत कटके आदी उपस्थित होते. स्पर्धेचे उत्कृष्ट असे नियोजन ट्रस्टचे डॉ. सुधा व डॉ. प्रकाश कांकरिया आणि त्यांचे सहकारी यांनी केले होते.



जागतिक पर्यावरण दिनानिमित्त छत्रपती अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये वृक्षारोपण करण्यात आले.

# छत्रपती अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण

नगर – निसर्गाचा समतोल राखण्यासाठी आणि वातावरण स्वच्छ आणि प्रदूषण विरहित ठेवण्यासाठी झाडे लावणे, झाडे जागवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. याच अनुषंगाने जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून नेप्ती येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या आवारामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत वृक्षारोपण कार्यक्रम हाती घेण्यात आला. ग्लोबल वार्मिंग चा प्रश्न भेडसावत असताना तसेच पावसाळा सुरू होण्याच्या आधीच्या कालावधीमध्ये वृक्षारोपण जर केले गेले तर निश्चितच त्यांच्या वाढीला सुलभ असे वातावरण निर्माण होऊन बहुतांश प्रमाणात सहजरित्या वृक्षसंवर्धन करता येते, असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. आर. खर्डे यांनी व्यक्त केले.

आवळा, करंजी, रामफळ, चिकू, पेरू, इत्यादी एकूण ४२ झाडांची लागवड महाविद्यालयाच्या परिसरात ५ जून रोजी करण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी तसेच महाविद्यालयातील विविध विभागातील विद्यार्थी विद्यार्थिनी आणि शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी हे सर्व वृक्षारोपण कार्यक्रमात उत्साहाने सहभागी झाले व जागतिक पर्यावरणाचा संदेश शिक्षकांमार्फत विद्यार्थ्यांना देण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रा. अक्षय देखणे, प्रा. अमेय कुलकर्णी, प्रा. अक्षय कांबळे या सर्वांनी विद्यार्थ्यांना नियोजनबद्ध आखणी करून देऊन वृक्षारोपण कार्यक्रमासाठी सहकार्य केले.

या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांना प्रा. पी. जी. निकम (सिव्हील विभागप्रमुख), डॉ. एम. के. भोसले (प्रथम वर्ष समन्वयक), प्रा. एस. एम. वाळके (ई ॲंड टी सी विभाग प्रमुख), प्रा. ए. बी. काळे (मेकॅनिकल विभागप्रमुख), प्रा. एस. पी. विधाते (कम्प्युटर इंजिनिअरिंग विभाग प्रमुख), डॉ. व्ही. व्ही. पाटील (ए.आय. विभागप्रमुख) या सर्वांचे प्रोत्साहन मिळाले.

# गोरक्षनाथगड व मांजरसुंबा डोंगरावर आयुर्वेदिक वृक्षांच्या बियांची लागवड

## सामाजिक बांधिलकी जोपासणारा सुयोग पार्क परिसरातील नागरिकांचा उपक्रम



गोरक्षनाथगड व मांजरसुंबा डोंगरावर आयुर्वेदिक वृक्षांच्या बियांची लागवड करण्यात आली.

नगर – नगर तालुक्यातील गोरक्षनाथगड व मांजरसुंबा डोंगर परिसरात पर्यावरण दिनाचे औचित्य साधून अर्जुन सौताडा या आयुर्वेदिक वृक्षांच्या बियांची लागवड करण्यात आली. कल्याण रोड येथील सुयोग पार्क परिसरातील नागरिकांनी एकत्र येत हा पर्यावरण संवर्धनाचा उपक्रम राबविला. पर्वत, गड व डोंगर भागातील हरवलेली हरितता पुन्हा निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम घेण्यात आला.

या उपक्रमात केमिस्ट असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष दत्ता गाडळकर, संतोष दसासे, परमेश्वर पाटील, शंकर राखुंडे, ॲड. संतोष शिनारे, रमेश गवळी, विजय कांडेकर, वसंत खोसे, नामदेव गुंड, उमेश दळवी, राजू कानडे, ॲड. नवनाथ नरसाळे, सागर गांधी, संतोष निमसे, ताराचंद भणगे, दिलीप गायकवाड, सखाराम मोटे मेजर आदी सहभागी झाले होते.

दत्ता गाडळकर म्हणाले की, आपल्या आजूबाजूचा निसर्ग हा मानवाच्या आयुष्याचा अविभाज्य भाग आहे. प्रदूषण, जंगलतोड आणि हवामान बदलाचे संकट दिवसेंदिवस वाढत आहे. अशा परिस्थितीत नागरिकांनी पुढाकार घेऊन पर्यावरण रक्षणासाठी कृतीशील होणे गरजेचे आहे. अर्जुन सौताडा हे झाड फक्त पर्यावरणपूरक नाही तर आयुर्वेदिक-दृष्ट्याही अत्यंत उपयोगी आहे. या झाडांची लागवड केल्याने केवळ हरित पट्टा वाढणार नाही, तर औषधीदृष्ट्याही लाभ मिळणार आहे. डोंगरद्या हिरवळीत न्हाल्यास भविष्यात पाणी, हवा व आरोग्य यांच्यावर सकारात्मक परिणाम होईल. या चळवळीत सर्वांच्या सहभागाची अपेक्षा असल्याचे त्यांनी सांगितले.

# बीबीए, बीसीए प्रवेशासाठी लवकरच पुन्हा प्रवेश परीक्षा

नगर – उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी शैक्षणिक वर्ष २५-२६ बीबीए, बीसीए प्रवेशासाठी पुन्हा सीईटी घेण्याची सुचना केल्याने प्रवेशोत्सुक विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.

२५-२६ या शैक्षणिक वर्षामध्ये अनेक विद्यार्थ्यांनी बीबीए बीसीए साठीची प्रवेश परीक्षा न दिल्यामुळे सदर विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली होती. आता पुनर्परीक्षेमुळे विद्यार्थ्यांना बीसीए बीबीए साठी प्रवेश घेणे सोयीचे होणार आहे. पहिल्या प्रवेश परीक्षेचा निकाल याआधीच जाहिर झाला आहे. आणि आता दुसरी परीक्षा घेण्यात येणार आहे.

या संदर्भात कुठलीही अडचण असेल किंवा कुठल्याही प्रकारची माहिती हवी असल्यास बीसीएसाठी डॉ. सय्यद (९८२३१००७५६) तसेच बीबीएसाठी डॉ. भावसार (९९६०४५९६४७) यांच्याशी संपर्क साधावा, अशी माहिती आय एम एस या व्यवस्थापन संस्थेचे संचालक डॉ. एम बी मेहता व उप संचालक डॉ. विक्रम बार्नबस यांनी दिली आहे.

त्याचप्रमाणे एम बी ए आणि एम सी ए च्या सीईटी चे निकाल जाहीर झाले असुन लवकरच प्रवेश प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता आहे.

या पार्श्वभूमीवर कोणत्याही मार्गदर्शनासाठी प्रा. सय्यद (एम बी ए) ९८८१४५८५७९ तसेच डॉ. भक्कड (एम सी ए) ९८५०५८५५५१ यांच्याशी संपर्क साधावा असे डॉ. विक्रम बार्नबस यांनी सांगितले.

# अर्थजगत

व्याजदर कपातीनंतर ईएमआय कमी करणे हे मासिक खर्चावर तात्काळ दिलासा देणारे असते, परंतु दीर्घकालीन फायद्यासाठी आणि व्याजबचतीसाठी हप्ता कायम ठेवून कर्जाची कालावधी कमी करणे हा पर्याय अधिक लाभदायक असतो. शेवटी, हप्ता कमी करायचा की मुदत, हे तुमच्या आर्थिक गरजांवर आणि नियोजनावर अवलंबून आहे. मासिक आर्थिक दडपण कमी करायचे असेल तर हप्ता घटवा, पण अधिक व्याजबचत हवी असल्यास मुदत कमी करा. कोणताही पर्याय निवडण्यापूर्वी गृहकर्ज हप्ता कॅल्क्युलेटर वापरून संभाव्य बचतीचा अंदाज घेणे ही एक शहाणीव ठरेल.

### रेपो दर कपातीचा लाभ घेण्यासाठी

## कर्जाचा हप्ता कमी करायचा की मुदत?

रिझर्व्ह बँकेने ६ जून रोजी घेतलेल्या पतधोरण समितीच्या (एमपीसी) बैठकीत रेपो दरात थेट ५० बेसिस पॉईंटस् म्हणजेच अर्धा टक्का कपात करत गृहकर्जधारकांसाठी मोठा दिलासा दिला आहे. याआधी फेब्रुवारी आणि एप्रिल महिन्यांत अनुक्रमे २५-२५ बेसिस पॉईंटसनी रेपो दरात कपात करण्यात आली होती. एकूणच या वर्षात रिझर्व्ह बँकेने १०० बेसिस पॉईंटस् म्हणजेच एक टक्का इतकी कपात करून कर्जदारांना मोठा फायदा करून दिला आहे.




भारतातील बहुसंख्य गृहकर्जधारक फ्लोटिंग व्याजदराच्या गृहकर्जाचा पर्याय निवडतात. हे व्याजदर थेट रेपो दराशी संलग्न असतात. त्यामुळे रेपो दरात झालेली प्रत्येक कपात ही गृहकर्जाच्या व्याजदरातही समान प्रमाणात कपात घडवून आणते. परिणामी गृहकर्जाचे हप्ते म्हणजेच ईएमआय कमी होतात किंवा हप्ते तसचे ठेवून कर्जाची मुदत कमी करता येते.

बँका किंवा वित्तीय संस्था व्याजदर कमी केल्यानंतर ग्राहकांना दोन पर्याय देतात. पहिला पर्याय म्हणजे कमी झालेल्या व्याजदरानुसार आपली मासिक हप्त्याची रक्कम (ईएमआय) कमी करणे आणि कर्जाची एकूण कालावधी पूर्ववत ठेवणे. दुसरा पर्याय म्हणजे ईएमआयची रक्कम जशीच्या तशी ठेवून कर्जाची कालावधी कमी करणे. या दोन्ही पर्यायांमध्ये गृहकर्जदाराला व्याजदरात बचत होते, पण बचतीचे प्रमाण वेगळे असते.

**■ जाणून घ्या**

उदाहरणार्थ, जर तुमचे गृहकर्ज ९.५ टक्क्यांवरुन ८.५ टक्क्यांवर आले असेल आणि तुम्ही मुदत पूर्ववत ठेवून फक्त हप्ते कमी करण्याचा पर्याय निवडला, तर ३० लाख रुपयांच्या कर्जावर मासिक हप्ता जवळपास १९२९ रुपयांनी कमी होतो आणि एकूण व्याजात ४.६३ लाख रुपयांची बचत होते. ५० लाखांच्या कर्जावर हप्ता सुमारे ३२१५ रुपयांनी कमी होतो आणि सुमारे ७.७१ लाख रुपयांची बचत होते. जर कर्जाची रक्कम एक कोटी असेल, तर मासिक हप्ता सुमारे ६४३१ रुपयांनी घटतो आणि एकूण व्याजात १५.४३लाख रुपयांची बचत होते.

पण जर आपण हप्ता तोच ठेवून फक्त मुदत कमी करण्याचा पर्याय निवडला, तर बचत अधिक होते. वरील उदाहरणात, हप्ता न बदलता मुदत कमी केली तर कर्जाचा कालावधी साधारण ३.१६ वर्षांनी घटते आणि व्याजबचतीचे प्रमाण वाढते.

उदाहरणार्थ, ५० लाख रुपयांच्या कर्जावर ही बचत सुमारे १७.६५ लाख रुपयांपर्यंत जाते, आणि एक कोटींच्या कर्जावर ती थेट ४५ लाखांच्या जवळपास पोहोचते.

अशीच बचत इतर व्याजदर कपातीतही होते. उदाहरणार्थ, जर व्याजदर ९ टक्क्यांवरून ८ टक्क्यांवर आला आणि तुम्ही फक्त ईएमआय कमी करण्याचा पर्याय निवडला, तर ३० लाखांच्या कर्जावर दरमहा जवळपास १८९९ रुपयांची बचत होते आणि एकूण व्याजबचत सुमारे ४,५६,००० रुपयांपर्यंत जाते.

एक कोटी रुपयांच्या कर्जावर ही बचत सुमारे ६३२९ रुपये मासिक आणि १८ लाख १८ हजार रुपये एकूण इतकी होते. परंतु हप्ता तसाच ठेवून मुदत कमी केली तर हीच बचत तिप्पट होते. उदाहरणार्थ, एक कोटीच्या कर्जावर तब्बल३३.०२ लाख रुपयांची बचत होते आणि कालावधी ३.६ वर्षांनी कमी होते.

तिसऱ्या उदाहरणात, जर व्याजदर ८.५ टक्क्यांवरुन ७.५ टक्क्यांवर आला आणि आपण ईएमआय कमी केला, तर ५० लाखांच्या कर्जावर मासिक बचत सुमारे ३११२ रुपये आणि एकूण बचत ७.५६ लाख रुपये होते. परंतु हप्ता न बदलता मुदत कमी केली, तर तीच बचत १५ लाखांच्या पुढे जाते आणि कालावधी जवळपास तीन वर्षांनी कमी होते. ◆◆◆

---

मानवी जीवन अनिश्चितेने भरलेले असून आर्थिक सुरक्षा ही महत्त्वाची ठरत आहे. अशावेळी टर्म इन्शूरन्स मोलाची कामगिरी बजावते. टर्म इन्शूरन्स प्लॅनचा फायदा विमाधारकास थेटपणे मिळत नसला तरी त्याच्या मृत्युनंतर वारसदारास किंवा विमाधारकावर अवलंबून असलेल्या व्यक्तीला मिळतो. हा प्लॅन बऱ्यापैकी कमी किंमतीत मिळतो आणि त्याचा हप्ता देखील दीर्घकाळापर्यंत चालतो. एखादा व्यक्ती आपल्या कुटुंबाचे भविष्य आर्थिकदृष्ट्या सुरक्षित करू इच्छित असेल तर त्याने टर्म इन्शूरन्स घेणे गरजेचे आहे. प्रामुख्याने एकाच व्यक्तीच्या उत्पन्नावर कुटुंब अवलंबून असेल तर अशा लोकांनी टर्म योजना खरेदीचा विचार करायला हवा. पण तो घेण्यापूर्वी काही गोष्टी ध्यानात घेतल्या पाहिजेत.

## 'सीएसआर' पाहूनच करा टर्म प्लॅनची खरेदी

कामिनी अय्यर या नोकरदार महिलेने दोन कोटी रुपयाची टर्म इन्शूरन्स योजना खरेदी केली. आई वडिल, भावंड तिच्यावरच अवलंबून असल्याने तिने विवाह केला नाही आणि भविष्यात कुटुंबाला आर्थिक संकटाला सामोरे जावू नये म्हणून टर्म इन्शूरन्स खरेदी केला. दुर्देवाने तिचा अकाली मृत्यू झाला. त्यानंतर तिच्या वडिलांनी टर्म इन्शूरन्सपोटी दावा केला असता कंपनीने




दावा नाकारला. असा अनुभव अय्यर कुटुंबालाच नाही तर अनेकांना आला आहे. यामागचे कारण म्हणजे विमा कंपनीचा सीएसआर न पाहणे. कामिनी अय्यर यांनी टर्म विमा घेताना कंपनीचा सीएसआर पाहिला नसेल आणि तो पाहिला असता तर कदाचित त्यांनी संबंधित कंपनीकडून टर्म विमा घेतला नसता. काही कारणांमुळे विमा कंपन्याकडून टर्म इन्शूरन्सचा दावा नाकारला जातो तेव्हा कुटुंबाला मनस्ताप सहन करावा लागतो. त्यामुळे टर्म इन्शूरन्स खरेदी करायचा असेल आणि अशा प्रकारच्या स्थितीपासून वाचायचे असेल तर काही गोष्टींची खबरदारी घेणे गरजेचे आहे.

**■ विमाजगत**

**क्लेम सेटलमेंट रेश्यो**

कोणत्याही विमा कंपन्यांचा सीएसआर (क्लेम सेटलमेंट रेशो) हा दावा निकाली काढण्याचे प्रमाण सांगतो. क्लेम सेटलमेंट किंवा दावा निपटारा करण्याचे प्रमाण पाहिले तर एखाद्या कंपनीकडे शंभर प्रकरणे आली असतील तर त्याने किती टक्के दावे निकाली काढले, हे समजते. उदा. एका कंपनीकडे शंभर अर्ज आले असतील आणि त्यापैकी ९९ जणांना दाव्याचे पैसे दिले असतील तर या कंपनीचा सीएसआर हा चांगला मानला जाईल. अशा कंपनीचा विमा खरेदी करण्यास काही हरकत नाही. मात्र शंभरपैकी नव्वद दावे निकाली काढले गेले असतील तर त्याची कामगिरी चांगली मानता येणार नाही. अशा कंपनीची विमा योजना घेण्याचे टाळावे.

**दाव्याची रक्कम**

दावा निपटारा करण्याचे प्रमाण पाहिल्यानंतर रक्कमेकडे देखील लक्ष दिले पाहिजे. उदा. कंपनीने शंभर दाव्यापैकी ९६ दावे निकाली काढले तर दावा निकाली काढण्याचे प्रमाण हे ९६ टक्के राहते. परंतु रक्कमेच्या दृष्टीने कंपनी कमी रक्कमेचे दावे निकाली काढत असेल आणि मोठ्या दाव्यापोटीची रक्कम देण्यास टाळाटाळ करत असेल तर अशावेळी दावा निकाली काढण्याचे प्रमाण कमी राहते.त्यामुळे टर्म प्लॅन खरेदी करण्यापूर्वी कंपनीने किती रक्कमेचे दावे निकाली काढले, ते पाहणे आवश्यक आहे.

**रायडरपासून सावध राहा**

एखादा व्यक्ती टर्म इन्शूरन्स खरेदी करत असेल तर त्याने या टर्म प्लॅनवर कोणत्याही प्रकारचा रायडर घेऊ नये. याउपरही त्याला रायडर घ्यायचा असेल तर त्याने हेल्थ इन्शूरन्स पॉलिसी किंवा ऑक्सिडेंटल इन्शूरन्स पॉलिसीवर घ्यावा. यामागचे कारण म्हणजे टर्म इन्शूरन्स स्वस्त असल्याने विमा कंपन्या रायडरवर जादा हप्ता आकारतात. त्यामुळे टर्म विमा आणि रायडरचा हप्ता अधिक होतो. हाच रायडर आरोग्य विमा किंवा अपघात विम्यावर घेतल्यास त्यावरचा हप्ता हा अपेक्षेपेक्षा कमीच राहतो.

**कमी दरात उपलब्ध**

टर्म इन्शूरन्स योजनेचा हप्ता खूपच कमी असतो आणि त्यात पॉलिसीधारकाला मिळणारे कवच अधिक असते. अर्थात या योजनेचा थेट फायदा पॉलिसीधारकास मिळत नाही, परंतु ही योजना त्याच्या पश्चात कुटुंबाला आर्थिक संरक्षण देते. एखादी व्यक्ती दोन कोटी रुपयाचा टर्म प्लॅन घेत असेल तर मासिक आधारावर केवळ ८०० ते एक हजार रुपये खर्च करावा लागतो. अर्थात वय अधिक असेल तर टर्म इन्शूरन्सचा हप्ताही जादा राहतो. अशावेळी कमी वयात टर्म इन्शूरन्स घेतल्यास त्याचा हप्ता कमी राहतो. ◆◆◆

---

आयकर विभागाने आर्थिक वर्ष २०२४-२५ (मूल्यांकन वर्ष २०२५-२६) साठी आयटीआर-१ (सहज) आणि आयटीआर-४ (सुगम) या फॉर्मच्या एक्सेल साधनांमध्ये सुधारणा केल्या आहेत. आता या अद्ययावत युटिलिटींमध्ये दीर्घकालीन भांडवली नफा, भाडे पावतीवरील सवलत (कलम ८० जीजी) आणि नवीन कर प्रणालीचा समावेश करण्यात आला आहे. हे बदल केंद्रीय अर्थसंकल्प २०२४ मध्ये सूचित केलेल्या तरतुदींनुसार आहेत आणि त्यामुळे करदात्यांना त्यांचा कर परतावा अधिक सुलभपणे आणि पारदर्शक पद्धतीने सादर करता येणार आहे.

## आयकर रिटर्न भरणे झाले अधिक सोपे




**■ आयटीआर-१ आणि आयटीआर-४ युटिलिटी म्हणजे काय?**

या दोन्ही साधनांचा उपयोग करून करदाता त्यांचे उत्पन्न, वजावट आणि इतर करसंबंधी माहिती संगणकावरच भरू शकतात. ही माहिती भरल्यानंतर ती पडताळून 'जेएसओएन' स्वरूपातील फाईल तयार करता येते. ही फाईल नंतर आयकर विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर अपलोड करून रिटर्न सादर करता येतो. हे साधन ऑफलाइन पद्धतीने वापरता येते, म्हणजेच इंटरनेट नसतानाही माहिती भरता येते. लवकरच पूर्णपणे ऑनलाइन सुविधा देखील सुरु होईल, अशी माहिती विभागाने दिली आहे.

**■ टॅक्स झोन**

**■ आयटीआर-१ (सहज) कोणासाठी आहे?**

हा फॉर्म त्या निवासी व्यक्तींसाठी आहे ज्यांचे एकूण उत्पन्न ५० लाख रुपयांपेक्षा कमी आहे आणि जे फक्त पगार, एका घरमालमत्तेतील उत्पन्न आणि इतर स्रोतांमधून (जसे की व्याज) उत्पन्न मिळवतात. व्यापारी किंवा स्वतंत्र व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींसाठी हा फॉर्म नाही.

**■ आयटीआर-४ (सुगम) कोणासाठी आहे?**

हा फॉर्म व्यक्ती, अविभक्त हिंदू कुटुंब (हिंदू अविभक्त कुटुंब) आणि काही प्रकारच्या कंपन्यांसाठी (एलएलपी वगळून) आहे, जे कलम ४४एडी, ४४एडीए आणि ४४एई अंतर्गत प्रकल्पित कर योजनेचा अवलंब करतात. हे प्रामुख्याने लघु व्यावसायिक, दुकानदार, फ्रीलान्स काम करणारे इत्यादींसाठी उपयुक्त आहे.

**■ नवीन काय समाविष्ट झाले आहे?**

**१. दीर्घकालीन भांडवली नफा :** शेअर्स किंवा म्युच्युअल फंडमधून मिळणाऱ्या दीर्घकालीन नफ्यावर (कलम ११२अ अंतर्गत १.२५ लाख रुपयांपर्यंत) कर माफ करण्यात आला असून त्याची नोंद आता आयटीआर-१ आणि ४ मध्येच करता येईल.

**२. भाडे पावतीवरील सवलत :** ज्या व्यक्तींना घरभाडे भत्ता (एचआरए) मिळत नाही आणि जे भाड्याने राहत आहेत, त्यांनी कलम ८० जीजी अंतर्गत सूट घेण्यासाठी आता फॉर्म १०बीए ऑनलाइन सादर करणे बंधनकारक आहे.

**३. नवीन कर प्रणाली :** ज्या करदात्यांनी मागील वर्षी फॉर्म १०-आयईए भरला होता, त्यांनी नवीन कर प्रणाली कायम ठेवायची की नाही, याबाबतची नोंद आता फॉर्ममध्ये करावी लागेल.

**■ करदात्यांसाठी दिलासा**

या सुधारित फॉर्ममुळे करदात्यांना त्यांची रिटर्न भरण्याची प्रक्रिया अधिक सोपी, वेगवान आणि अचूक होईल. विशेषतः नोकरदार, लघु व्यापारी आणि निवृत्त व्यक्ती यांना याचा अधिक फायदा होईल. आयकर विभागाने सूचित केले आहे की, करदात्यांनी या सुधारित युटिलिटीचा वापर करून आपले रिटर्न वेळेत भरावेत, जेणेकरून कोणत्याही दंडात्मक कारवाईपासून बचाव करता येईल. ◆◆◆

---

## शून्य बॅलन्सवर आता दंड नाही!

आतापर्यंत कोणत्याही बँकेत नियम असा होता की जर तुम्ही एका महिन्यात विशिष्ट किमान रक्कम राखली नाही तर तुम्हाला त्यासाठी शुल्क भरावे लागते. पण आता सरकारी क्षेत्रातील एका बँकेकडून या संदर्भात मोठा दिलासा मिळणार आहे.कॅनरा बँकेने जाहीर केले आहे किमान शिल्लक ठेवली नाही तरी तुम्हाला कोणतेही शुल्क भरावे लागणार नाही.

यामध्ये बचत खाती, एनआरआय बचत खाती आणि पगार खाती यांचा समावेश आहे. १ जून २०२५ पासून हा नियम लागू करण्यात आला आहे.

**वेगवेगळ्या बँकांचे वेगवेगळे शुल्क**

सध्या प्रत्येक बँकेचे शहरी, निमशहरी किंवा ग्रामीण भागातील ग्राहकांसाठी किमान शिल्लक रकमेचे वेगवेगळे नियम आहेत. याबाबत बँकेकडून वेळोवेळी बदल केले जातात. म्हणून, ज्या बँकेत तुमचे खाते आहे त्या बँकेचे नियम आणि कायदे तुम्हाला नियमितपणे माहित असणे महत्वाचे आहे. जर तुम्ही किमान शिल्लक ठेवली नाही तर काही बँका तुम्हाला चेक बुक किंवा नेट बँकिंगसारख्या सुविधांपासून वंचित ठेवू शकतात. ◆◆◆




---

## 'विकसित भारता'साठी राजन नीती

विकसित होण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करणारा भारत या वर्षाच्या अखेरीस जगातील चौथा जीडीपी बनण्याची अपेक्षा आहे. जरी, नीती आयोगाने म्हटले आहे की भारत आता जगातील चौथा जीडीपी बनला आहे, परंतु आयएमएफचा असा विश्वास आहे की या वर्षाच्या अखेरीस भारत ४ ट्रिलियन जीडीपी असलेला देश बनेल.

एका खाजगी टेलिव्हिजन वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमात आरबीआयचे माजू गव्हर्नर रघुराम राजन यांनी येत्या काही काळात भारत कसा विकसित होऊ शकतो याची संपूर्ण रणनीती सांगितली आहे.



दरम्यान,२०२७ पर्यंत, भारत जलद विकास दर गाठून जगातील तिसऱ्या अर्थव्यवस्थेला मागे टाकेल आणि २०४७ पर्यंत भारत विकसित होईल असा अंदाज लावण्यात येत आहे. परंतु सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ आणि माजी आरबीआय गव्हर्नर रघुराम राजन यांचे याबद्दल वेगळे मत आहे. ते म्हणतात की, जर भारत विकसित व्हायचा असेल तर विकास दर ८.५ किंवा ९ टक्के दराने पुढे जावे लागेल, कारण आपण अजूनही तुलनेने गरीब देश आहोत.

रघुराम राजन यांचे हे विधान अशा वेळी आले आहे जेव्हा जागतिक अनिश्चितता असूनही, भारताचा जीडीपी मजबूत आहे. आर्थिक वर्ष २०२४-४५ च्या चौथ्या तिमाहीत जीडीपी वाढ ७.४ टक्के होती आणि या वर्षी ती ६.५ टक्के राहण्याची अपेक्षा आहे. जगातील इतर अनेक मजबूत अर्थव्यवस्थांपेक्षा ही चांगली कामगिरी आहे.

मात्र, रघुराम राजन यांनी कबूल केले की भारताचा सध्याचा ६.५ टक्के विकास दर हा खूप प्रभावी विकास दर आहे, विशेषतः जेव्हा सरकारने निवडणुकीदरम्यान खर्चात कपात केली आहे. परंतु ते म्हणाले की आता निष्क्रिय बसण्याची गरज नाही. ते म्हणाले की आता भारताची वेळ असू शकते, परंतु आपल्याला ती संधी आपल्या सर्व शक्तीने घ्यावी लागेल.

रघुराम राजन म्हणाले की, भारताला शाश्वत विकासासाठी, गुंतवणुकीपासून ते वापर वाढवण्यापर्यंत, देशांतर्गत आणि परदेशी दोन्ही स्तरांवर सुधारणांसह निर्णायक निर्णय घ्यावे लागतील. ◆◆◆

---

## सोनेतारणावर मिळणार अधिक कर्ज

सध्या सोन्याच्या मूल्याच्या ७५ टक्के इतके कर्ज मिळते. लवकरच ही मर्यादा ८५ टक्क्यांपर्यंत वाढविण्यात येणार आहे. मात्र हा बदललेला नियम फक्त अडीच लाख रुपयांपर्यंतच्या कर्जांना लागू होणार असल्याचे रिझर्व बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी पतधोरणानंतर पत्रकारांशी बोलत सांगितले. ही सवलत बिनशर्त देण्यात येणार नाही. तर त्यासाठी काही अटी लागू होणार आहेत. सध्या सोन्याशी कर्जाचे प्रमाण ठरविताना फक्त मूळ कर्जाची रक्कम गृहीत धरली जाते. आता नव्या पद्धतीने कर्जाच्या रकमेबरोबरच त्यावरील व्याजाच्या रकमेचा ही समावेश केला जाणार आहे.

**■ अर्थ धोरण**

ते म्हणाले की, सध्या सार्वजनिक क्षेत्रातील बँका सध्याच्या नियमाप्रमाणे सोन्याच्या मूल्याच्या ७५ टक्के कर्ज देतात. मात्र बिगर बँकिंग वित्तीय संस्था आणि छोट्या बँका ८८% पर्यंत कर्ज देत असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे मूळ रकमेत व्याजाचाही समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. लवकरच सुवर्णकारणासंदर्भातील मार्गदर्शक नियमावली जाहीर होणार आहे. यामध्ये या नव्या बाबींचा समावेश केला जाणार असल्याचे मल्होत्रा यांनी सांगितले. एकूणच सुवर्ण कर्ज घेणारा ग्राहक हा गरजवंत



असतो. त्याची काळजी घेतली जावी हा नव्या मार्गदर्शक सूचनांचा उद्देश आहे. सध्या बँका, बिगर बँकिंग वित्तीय संस्था आणि नागरिकांबरोबर या विषयावर चर्चा चालू आहे. चर्चा संपल्यानंतरच अंतिम मार्गदर्शक नियमावली जाहीर करण्यात येईल.

सोने कोणाच्या मालकीचे आहे, यासंदर्भात संदीपदाचा संपावी याकरिता जर सोन्याची पावती नसेल तर संबंधित कर्ज घेणार्यांनी सोने आपल्या मालकीचे असल्याचे प्रतिज्ञापत्र देण्याचा नियम केला जाणार आहे. त्याचबरोबर अडीच लाख रुपयापर्यंतच्या कर्जाला क्रेडिट इतिहास जास्त पाहिला जाणार नाही. जर सोने तारण ठेवून प्राधान्यक्रमाच्या क्षेत्रातील कर्ज घेतले तरच कर्जाचा उपयोग सांगितलेल्या कामासाठीच होत आहे की नाही हे पाहिले जाईल. इतरही काही बाबी तारण असल्यास कर्जरक्कम वाढू शकते. ◆◆◆

---

## शेअर बाजाराला दरकपातीचा बूस्टर

रिझर्व बँकेने आपल्या रेपो या मुख्य व्याजदरात तब्बल अर्धा टक्के कपात केली. त्याचबरोबर रोख राखीव प्रमाणात अपेक्षेपेक्षा जास्त म्हणजे एक टक्क्याची कपात केली. यामुळे बँकांना वापरासाठी अडीच लाख कोटी रुपये मिळणार आहेत. या कारणामुळे बँकांच्या शेअरची जोरदार खरेदी होऊन बँक निफ्टी विक्रमी पातळीवर गेला.

रिझर्व बँकेने जारी केलेल्या माहितीत म्हटले आहे की,२९ नोव्हेंबरपर्यंत चार समान हप्त्यात सीआरआर एक टक्क्यांनी कमी केला जाईल. त्यानंतर सीआरआर केवळ तीन टक्के होणार आहे. म्हणजे बँकांना त्यांच्याकडे आलेल्या ठेवीच्या केवळ तीन टक्के रक्कम रिझर्व बँकेकडे ठेवावी लागणार आहे.

रिझर्व बँकेच्या या घोषणेनंतर बँकांच्या शेअरच्या भावावर आधारित बँक निफ्टी एकाच दिवसात १.४७ टक्क्यांनी म्हणजे ८१७ अंकांनी वाढून ५६,५७८ अंकावर गेला. एक वेळ हा निर्देशांक ५६,६९५ अंकापर्यंत वाढला होता. व्याजदर कमी झाल्यामुळे आणि सीआरआर कमी झाल्यामुळे बँकांचा कर्ज पुरवठा वाढणार आहे. त्याचबरोबर बँकाचा नफा वाढणार आहे. या कारणामुळे बऱ्याच गुंतवणूकदारांनी बँकांच्या शेअरची मोठ्या प्रमाणात खरेदी केली.

केवळ बँकांच्याच नव्हे तर व्याजदराशी संबंधित इतर रिअल इस्टेट, वाहन, ग्राहक वस्तू इत्यादी क्षेत्राच्या कंपन्यांच्या शेअरच्या भावातही वाढ झाली असे जियोजित वित्तीय सेवा या संस्थेचे विश्लेषक विनोद नायर यांनी सांगितले. गेल्या काही महिन्यापासून बँकांचा कर्ज पुरवठा कमी होत होता. तो कर्जपुरवठा आता वाढण्यास मदत होणार आहे. बँकांना कमी व्याजदरावर ठेवी आकर्षित करण्यात अडचणी येत होत्या. आता ही तूट सीआरआर कमी केल्यामुळे काही प्रमाणात भरून निघू शकणार आहे.

**■ मार्केट वॉच**




व्याजदर कमी होणार असल्यामुळे आणि रोख राखीव प्रमाण कमी होणार असल्यामुळे सर्वच क्षेत्रांचा भांडवल पुरवठा वाढणार आहे. अशा परिस्थितीत बहुतांश क्षेत्रातील कंपन्यांच्या शेअरची जोरदार खरेदी झाली. यामुळे शुक्रवारी मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स ७४६ अंकांनी वाढून ८२,१८८ अंकावर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टी १ टक्क्यांनी वाढून २५,००३ अंकावर बंद झाला. इंडस्ट्रियल्स आणि भांडवली वस्तू वगळता इतर सर्व क्षेत्राचे निर्देशांक वाढले.

चालू आठवड्यातही ही घोडदौड अशीच कायम राहण्याची शक्यता आहे. टेक्निकल चार्टनुसार बँक निफ्टीमध्ये आणखी १००० अंकांची वाढ होऊ शकते. एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक यांनी ब्रेकआऊट दिला आहे. आता एसबीआयच्या समभागात तेजी दिसू शकते. ◆◆◆

# गोठ्यात सुरु असलेल्या कत्तलखान्यावर छापा

**एमआयडीसी पोलिसांची कारवाई; चौघांविरुद्ध गुन्हा**

नगर – बेकायदेशीररित्या गोवंशीय जनावरांची कत्तल करणाऱ्यांवर एमआयडीसी पोलीसांनी छापा टाकला. या कारवाईत ४ लाख ७० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करुन दोघांना ताब्यात घेण्यात आले. ही कारवाई छत्रपती संभाजीनगर रोडवरील जेऊर बायजाबाईचे येथे केली.



बेकायदेशीररित्या गोवंशीय जनावरांची कत्तल करणाऱ्यांवर एमआयडीसी पोलीसांनी छापा टाकला.

याबाबतची माहिती अशी की, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी बकरी ईदच्या पार्श्वभुमीवर जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांना अवैध धंद्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले. त्या आदेशान्वये ८ जून रोजी सकाळी १०.३० वाजण्याच्या सुमारास सपोनि माणिक चौधरी यांना मिळालेल्या गुप्त माहितीवरुन एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नगर तालुक्यातील जेऊर बायजाबाई गावातील मुनाफ चाँद शेख आणि मुजफ्फर चाँद शेख याचे राहते घराचे पाठीमागील गोठ्यात कत्तल केलेले गोवंशीय जनावरांचे मांस, तसेच कत्तल करण्याचे उद्देशाने गोवंशीय जनावरे निर्दयतेने डांबून ठेवले असल्याबाबत मिळालेल्या माहितीवरुन एमआयडीसी पोलीस पथकाने त्या ठिकाणी छापा टाकला असता सलमान अजीज शेख, (वय २५ वर्षे, रा. घासगल्ली, कोठला, अ.नगर) यास ताब्यात घेतले. त्याचेकडे चौकशी केली असता त्याने त्याचे साथीदारांची नावे इकलास शेख, मुनाफ चाँद शेख, मुजफ्फर चाँद शेख, अस्लम खलील कुरेशी असल्याची सांगितली. पोलिसांनी तेथून ५०० किलो गोवंशीय जनावरांचे मांस, पाच गोवंशीय जातीची जनावरे, वापरण्यात आलेल्या गाड्या तसेच कत्तलीसाठी लागणारे साहित्य असा एकुण ४ लाख ७० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला.

याबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात चौघाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील कारवाई एमआयडीसी पोलीस करीत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, पोलीस उप अधीक्षक अमोल भारती (नगर ग्रामिण विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि. माणिक चौधरी, पोलीस उप निरीक्षक विनोद परदेशी, पोलीस उप निरीक्षक मनोज मोंढे, पोलीस उप निरीक्षक देविदास भालेराव, पोलीस उप निरीक्षक अनिल आढाव, पोलीस अंमलदार बाबासाहेब काळे, राकेश खेडकर, रमेश थोरवे, राजु सुद्रिक, भगवान वंजारी, सुरेश सानप, ज्ञानेश्वर तांदळे, अक्षय रोहोकले, चालक पोलीस अंमलदार पवार यांचे पथकाने केली.

## फकीरवाडा येथील कत्तलखान्यावर छापा

नगर – विनापरवाना गोवंशीय जनावरांची कत्तल करुन गोमांस विक्री करणाऱ्या कत्तलखान्यावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईत चौघांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडील १५० किलो गोमांस, एक सत्तूर, एक सूरी असा ४५ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई मुकुंदनगर येथील वाबळे कॉलनी येथे ८ जून रोजी केली.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना मिळालेल्या माहितीवरुन स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी मुकुंदनगर येथील फकीरवाडा येथे सुरु असलेल्या कत्तलखान्यावर छापा टाकला. या कारवाईत इरफान एजाज कुरेशी (रा. शेंडी), तौफिक शफिक शेख (वय २७ रा. दगडी चाळ मुकुंदनगर), सरफराज रफिक शेख (रा. मुकुंदनगर), अबुझर खालील सय्यद (वय २३ रा. वाबळेगल्ली मुकुंदनगर) यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडील ४५ हजार रुपये किमतीचे १५० किलो गोमांस, एक सतुर व एक सूरी असा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात पोलीस अंमलदार जालिंदर माने यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन चौघाविरुद्ध बी एन एस २७१, ३२५, ३ (५) सह महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियम सन १९५५ चे सुधारित २०१५ चे कलम ३ (क) ९ प्रमाणे गुन्हा दाखल केला पुढील तपास पोलीस हवालदार झरेकर करीत आहे.

## चोरी करण्याच्या उद्देशाने संशयितरित्या फिरणाऱ्या एकास पकडले, दोघे पसार

नगर – कोठला येथील यमाहा शोरुम जवळ, चोरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका इसमास नागरिकांनी पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. यावेळी अन्य दोघे तेथून पळून गेले. ही घटना ८ जून रोजी पहाटेच्या सुमारास घडली.

याबाबतची माहिती अशी की तोफखाना पोलीस शहरात पेट्रोलिंगगस्त करीत असताना त्यांना तीन वाजण्याच्या सुमारास डायल ११२ ला कॉल आला की, यमाहा शोरुम जवळ, कोठला येथे चोरी करण्याचा प्रयत्न झाला असुन एक इसम यास ताब्यात घेऊन ठेवलेले आहे. व इतर दोन इसम त्या ठिकाणावरुन पळुन गेले आहे. असा कॉल आल्याने तोफखाना पोलीस त्या ठिकाणी गेले असता त्यावेळी त्या ठिकाणी बंद पडलेल्या एम्स हॉस्पिटल येथील सेक्युरुटी गार्ड सुनिल लक्ष्मण भोईटे (वय ४२, रा. सर्जेपुरा, अ.नगर), शेख जहिर सय्यद (रा.रामचंद्र खुंट, अ.नगर) व मुस्ताक सय्यद (रा.कोतवाली पोलीस ठाणे शेजारी, अ.नगर) यांनी त्या इसमांना पकडुन ठेवलेले होते. तेव्हा त्या इसमास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव सरोज राजु केदारे, (वय २१, रा.बोल्हेगांव, अ.नगर) असे सांगितले. व त्याचेकडे अधिक चौकशी केली असता त्याने त्याच्यासोबत असणारे पप्पु कदम व कुणाल चव्हाण (दोघे रा. बोल्हेगांव, श्रीराम पाल, ता. जि. अ.नगर) हे पळुन गेले असल्याचे सांगितले. सरोज केदारे, यास विचारले की, तुम्ही एवढ्या रात्री या ठिकाणी काय करता तेव्हा त्यांनी प्रथम उडवाउडवीची उत्तरे दिली. म्हणुन पोलिसांनी संशयीत इसमास तोफखाना पोलीस ठाण्यात नेले.

या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात पो. कॉ. सागर साबळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सरोज केदारे, पप्पू कदम, कुणाल चव्हाण तिघांविरुध्द महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२२ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. तपास पोलीस हवालदार जालिंदर आव्हाड हे करीत आहेत.

## दुकान फोडून चोरीचा प्रयत्न करणाऱ्या एकास रंगेहाथ पकडले

नगर – बंद दुकानाच्या शटरचे दोन कुलूप, लोखंडी गजाच्या साहाय्याने तोडून चोरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका परप्रांतियास नगर तालुका पोलिसांनी पकडले. ही कारवाई ७ जून रोजी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास नगर तालुक्यातील पारेवाडी येथे घडली.

याबाबत बबन गणपत वैराळ (वय ४० राहणार पारेवाडी, तालुका नगर) याने नगर तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचे नगर तालुक्यातील पारेवाडी येथे ओकार मोबाईल शॉपी नावाचे दुकान आहे. त्यांनी नेहमीप्रमाणे रात्री दुकान बंद केले असता रात्री ११ वाजण्याच्या सुमारास एक इसम लोखंडी गज घेऊन आला. व त्याने बंद दुकानाचे शटरचे दोन्ही कुलूप तोडून चोरीचा प्रयत्न केला.

यावेळी झालेल्या आवाजाने येथील नागरिक जागे झाले त्यांनी चोरट्यास रंगेहाथ पकडले. आणि याबाबत नगर तालुका पोलीस यांना कळविले. नगर तालुका पोलिसांना माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ त्या ठिकाणी जाऊन त्या इसमास ताब्यात घेतले. व त्यास त्याचे नाव व पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव सोनू महेंद्र कुमार (राहणार रामवाडी, शहदगंज चंदोली, उत्तर प्रदेश) असे असल्याचे सांगितले. पोलिसांनी त्यास ताब्यात घेतले.

याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात बबन वैराळ यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन बी एन एस २०२३ चे कलम ३०३ (२), ६२ प्रमाणे गुन्हा दाखल केला पुढील तपास पोलीस हवालदार सरोदे हे करीत आहेत.

## माळीवाडा बसस्थानकातून महिलेच्या सोन्या-चांदीच्या दागिन्याची चोरी

नगर – एसटी बसमध्ये बसण्याकरिता आत प्रवेश करणाऱ्या महिलेच्या पर्समधील ९.५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व ३.५ भाराचे चांदीचे पैंजण असा ऐवज अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेऊन चोरुन नेला. ही घटना माळीवाडा बसस्थानक येथे ८ जून रोजी दुपारी घडली.

याबाबत अर्चना बंडू ढवळे (वय ३६, वर्षे, रा.मानुर ता. शिरुर, जि बीड) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या त्यांच्या कुटुंबासह ७ जून रोजी मेरठहुन गावी जाण्यासाठी निघाल्या. ते अ.नगर स्टेशन येथे ८ जून रोजी दुपारी आले. तेथून गावी जाण्यासाठी माळीवाडा बस स्टॅण्ड येथे दुपारी आल्या. व अ.नगर ते पाथर्डी एस टी बस लागल्याने फिर्यादी व त्यांचे पती व मुले यांनी गर्दीतून बसमध्ये प्रवेश केला. व तिकीटासाठी पैसे काढण्यासाठी फिर्यादी यांनी पर्स पाहिली असता पर्सची चेन उघडी दिसली. त्यावेळी पर्समध्ये सोन्याचे व चांदीचे दागिने पाहिले असता ते दिसुन न आल्याने फिर्यादी यांनी आजुबाजुला शोधाशोध केली. परंतु त्यांना दागिने कोठेही मिळून आले नाही. त्यावेळी फिर्यादी व त्यांचे पतीचे लक्षात आले की, एस टी बसमध्ये चढताना कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादीच्या पर्स मधील दागिने चोरुन नेले. चोरीस गेलेल्या दागिन्यात ६ ग्रॅम वजनाची सोन्याची मणी असलेली पोत, व त्यांमध्ये सोन्याचा पत्ता असलेली, ३.५ ग्रॅम वजनाचे कानातील सोन्याचे सुई धागा, ३.५ भार असलेले पायातील चांदीचे पैंजण असा ऐवज चोरीस गेला. त्यानंतर त्यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात जाऊन फिर्याद दिली.

कोतवाली पोलिसांनी अर्चना ढवळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध बी एन एस कलम ३०३ (२) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास कोतवाली पोलीस करीत आहेत.

## ऑनलाईन तिकीट काढण्याच्या कारणावरुन बसचालक व वाहकास मारहाण; एकाविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – ऑनलाइन तिकीट काढण्याच्या कारणावरुन वाद घालून बसचालक व वाहकास शिवीगाळ दमदाटी करीत लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन सरकारी कामात अडथळा आणल्याची घटना ९ जून रोजी पहाटे साडेपाच वाजण्याच्या सुमारास स्टेशन रोडवरील मार्केट यार्ड चौकातील नेवासकर पेट्रोल पंपाजवळ घडली.

याबाबत राजेंद्र गंगाधर कराळे (वय ४१, रा.आगडगाव, ता. नगर) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. फिर्यादीत म्हटले आहे की फिर्यादी हे महाराष्ट्र परिवहन महामंडळात वाहक म्हणून नोकरीस आहे. फिर्यादी हे ९ जून रोजी पहाटे ५ वाजता बसचालक निलेश अशोक शेळके, (रा. गुणवडी, ता.नगर) सह बस (क्र.एम एच १४ बी एल ४०) ने तारकपुर बसस्थानक येथुन प्रवाशी घेवुन निघाले. फिर्यादी हे तिकीट काढत असताना नेवासकर पेट्रोलपंप, मार्केटयार्ड, अ.नगर येथुन जात असताना मागील सीटवर बसलेल्या इसमास कोठे जायचे, असे विचारले त्यावर त्याने मला पुणे येथे जायचे आहे, असे म्हणाल्यामुळे फिर्यादी त्यांना तिकीटासाठी पैसे द्या असे म्हणाले असता त्याने माझ्याकडे रोख पैसे नसुन ऑनलाईन तिकीट घेतो असे म्हणाला. त्यावर फिर्यादी त्याला म्हणाले की ऑनलाईन सर्व्हर बंद आहे तुम्हाला रोख पैसे देवुन तिकीट काढावे लागेल असे म्हणाले असता तो इसम फिर्यादी यांच्याशी हुज्जत घालुन मी ऑनलाईन तिकीट काढतो मी रोख पैसे का देऊ असे म्हणुन शिवीगाळ करु लागला. त्यानंतर चालक यांना फिर्यादी यांनी गाडी थांबविण्यास सांगुन त्या इसमास खाली उतरुन घेण्यास सांगितले असता त्याने मी खाली उतरणार नाही असे म्हणुन त्याने फिर्यादीची गचंडी पकडुन गाडीच्या खाली रोडवर ओढुन तु जास्त शहाणा झाला का असे म्हणुन फिर्यादीच्या तोंडावर चापटीने मारहाण करुन तु येथून आता गाडी कशी घेवुन जातो तेच मी पाहतो असे म्हणुन फिर्यादीला खाली पाडुन लाथाबुक्क्याने मारहाण केली. त्यावेळी गाडी चालक निलेश शेळके हे फिर्यादीस सोडवण्याकरीता गाडी बंद करुन खाली आले तेव्हा त्या इसमाने त्यांना देखील वाईट शिवीगाळ करुन त्यांची गचंडी पकडुन त्यांनाही धक्काबुक्की केली. या मारहाणीत फिर्यादीचा मोबाईल खाली पडुन मोबाईलचे नुकसान झाले आहे. तेंव्हा फिर्यादी व चालक यांनी त्यास पकडुन पुणे बसस्थानक नियंत्रण कक्ष येथे घेवुन गेले. तेथुन कोतवाली पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी येऊन त्या इसमास नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव साहील प्रकाश साळवे, (वय २१ वर्षे, रा.भिंगारदिवे मळा, नवीन प्रेमदान हाडको, सावेडी, अ.नगर) असे सांगितले.

या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी राजेंद्र कराळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन साहिल साळवे याच्या विरुद्ध बीएनएस १३२ १२१(१) ३५२ प्रमाणे गुन्हा दाखल केला.

## गुलमोहर रस्त्यावर पारिजात चौकातील ड्रेनेजलाईन कामासाठी १० दिवस वाहतुकीच्या मार्गात बदल

**गैरसोय टाळण्यासाठी नागरिक, वाहनचालकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा : आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे**

नगर – शासनाने उपलब्ध करून दिलेल्या निधीतून सावेडी टेलिफोन ऑफिस ते पारिजात चौक ते एकविरा चौक ते तपोवन रस्ता या रस्त्याच्या कामाला सुरुवात करण्यात येणार आहे. तत्पूर्वी या मार्गावर अंडरग्राऊंड ड्रेनेज लाईन टाकण्यात येत आहे. गुलमोहर रस्त्यावर पारिजात चौक येथे या कामाला सुरुवात झाली आहे. ८ ते १८ जून या कालावधीत हे काम करण्यात येणार आहे. त्यामुळे दहा दिवस या रस्त्यावरील वाहतूक अन्य मार्गाने वळवण्यात आल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली आहे.





गुलमोहर रस्त्यावर पारिजात चौकातील ड्रेनेज लाईन कामाची पाहणी करताना आयुक्त यशवंत डांगे.

आमदार संग्राम जगताप यांच्या पाठपुराव्यातून राज्य शासनाने या रस्त्याच्या कामासाठी मोठा निधी उपलब्ध करून दिला आहे. त्यातून ड्रेनेज लाईनचे काम सुरू करण्यात आले आहे. या ड्रेनेज लाईनमुळे पारिजात चौक परिसरातील वसाहतींमध्ये साचणाऱ्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागणार आहे. पुढील दहा दिवस हे काम सुरू राहणार आहे. या कामात काही ठिकाणी झाडे अडथळा ठरत आहेत. त्यातील शक्य तेवढी झाडे वाचवून काम मार्गी लावण्याचा प्रयत्न आहे. काही झाडे अपरिहार्य परिस्थितीत काढावी लागणार आहेत. मात्र, या रस्त्याच्या कामात दीड मीटर रुंदीचे रस्ता दुभाजक प्रस्तावित आहे. त्यात सुमारे दीडशे झाडे लावण्यात येणार असल्याचेही यशवंत डांगे यांनी स्पष्ट केले.

गुलमोहर रोडवरील पारिजात चौक परिसरात अंडरग्राउंड ड्रेनेजचे काम होणार असल्याने हा रस्ता वाहतुकीसाठी १० दिवस बंद राहणार आहे. त्यामुळे नागरिकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा. छत्रपती संभाजीनगर महामार्गावर सुरभी हॉस्पिटल ते कलानगरकडे जाण्यासाठी गुलमोहर रोड येथील आमदार संग्राम जगताप यांचे कार्यालय – हनुमान मंदिर रामकृष्ण कॉलनी – अष्टविनायक अपार्टमेंट समता नगर – झालानी हॉस्पिटल मार्गे गंगा उद्यान असा पर्यायी मार्ग उपलब्ध आहे. नागरिकांनी या मार्गाचा वापर करून गैरसोय टाळावी, असे आवाहन यशवंत डांगे यांनी केले आहे.

## एशियन चॅम्पियनशिपसाठी अजिंक्य शेवते यांची निवड

**आंतरराष्ट्रीय एशियन चॅम्पियनशिप २०२५ मध्ये भारताचे नेतृत्व करणार**



नगर – हिंजवडी येथे अलीकडेच पार पडलेल्या इंडियन बॉडी बिल्डर्स फेडरेशन आयोजित एशिया चॅम्पियनशिप निवड चाचणीमध्ये अहिल्यानगरचा पुत्र अजिंक्य अनिल शेवते याने उल्लेखनीय यश मिळवले आहे. अजिंक्यची मेन्स स्पोर्ट फिजिक १८० सेंटीमीटर वरील गटात थेट भारताच्या नेतृत्व करण्यासाठी निवड झाली असून, तो आता थायलंड येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय एशियन चॅम्पियनशिप २०२५ मध्ये भारताचे नेतृत्व करणार आहे.

ही स्पर्धा १८ ते २५ ऑगस्ट दरम्यान थायलंडमध्ये पार पडणार असून, विविध आशियाई देशातील नामवंत खेळाडू यात सहभागी होणार आहेत. अजिंक्यने आपल्या कष्ट, शिस्त आणि चिकाटीच्या जोरावर हे यश मिळवले असून, त्याच्या या निवडीमुळे संपूर्ण जिल्ह्यातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

अजिंक्य शेवते याचे यश तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत असून, त्याच्या पुढील वाटचालीसाठी सर्वत्र शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

## प्रशिक्षण वर्गातील महिला शिक्षकांना वट सावित्री पौर्णिमेच्या पूजेसाठी सुट्टी मिळावी

नगर – शिक्षकांचे तालुका निहाय प्रशिक्षण वर्ग सावेडी आनंदनगर विद्यालय येथे सुरू आहे. या प्रशिक्षण वर्गात महिला शिक्षकांचा बहुसंख्येने सहभाग आहे. प्रशिक्षण वर्ग १२ जून पर्यंत सुरू आहे. परंतु महिलांचा वटपौर्णिमा उत्सव १० जून रोजी असल्याने अहिल्यानगर जिल्ह्यातील महिला शिक्षकांना वडाची पूजा करण्यासाठी सवलत देण्यात यावी.

मुहूर्त वेळ १२.४५ पासून पुढे आहे. तरी विश्व हिंदू परिषदेकडून आवाहन करण्यात येते की, अर्धा दिवस महिला शिक्षकांना सवलत मिळावी. याबाबत विश्व हिंदू परिषदेत जिल्हा सहमंत्री शरदराव नगरकर यांनी निवेदन दिले आहे.

## भाजी विक्रेत्याकडून ग्राहकास लोखंडी पाईपाने मारहाण

नगर – भाजीपाल्याचे पैसे देण्याकरिता नंबर मागितला असता त्याने नंबर न देता मोबाईल माझ्याकडे दे असे म्हटल्याने ग्राहकाने मोबाईल घेण्यास नकार दिला व भाजीपाला न घेता निघून जात असता भाजी विक्रेत्याने शिवीगाळ दमदाटी करीत लोखंडी पाईपने बेदम मारहाण केली. ही घटना नवनागापूर येथील गजानन कॉलनी चौक येथे ७ जून रोजी रात्री आठ वाजता घडली.

याबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात राहुल भीम शर्मा (वय २६ रा. दूधडेअरी चौक, नवनागापूर मूळ रा. पकडीदास, तालुका फाटा, जिल्हा कुशीनगर, उत्तर प्रदेश) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी व त्यांचा मित्र आकाश यादव हे भाजीपाला घेण्याकरिता नवनागापूर येथील गजानन कॉलनी चौकात गेले असता त्यांनी भाजी विक्रेता अनिश भाऊ पवार (रा. गजानन कॉलनी नवनागापूर) यांच्याकडून भाजी खरेदी केली. भाजीचे पैसे देण्याकरिता फिर्यादी याने भाजी विक्रेत्याला मोबाईल नंबर विचारला असता त्याने नंबर न सांगता, मी नंबर टाईप करुन देतो, मोबाईल माझ्याकडे दे असे म्हणाला असता फिर्यादीने त्यास मोबाईल देण्यास नकार दिला व भाजीपाला न घेता तिथून निघून जात असताना भाजी विक्रीचा अनिश पवार याने त्यांना दमदाटी व शिवीगाळ करुन लोखंडी पाईपाने फिर्यादीच्या बरगडीवर हातावर तसेच आकाश यादव याचे हातावर मारहाण करुन दुखापत केली.

याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात राहुल शर्मा यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अनिश पवार व आशा पवार यांच्याविरुद्ध बी एन एस कलम ११८ (१), ३५२, ३५१ (२), ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार टेमकर करीत आहे.

## मोटारसायकलवरुन दारुची वाहतूक करणाऱ्या एकास मुद्देमालासह पकडले

नगर – मोटारसायकल वरुन गावठी हातभट्टी दारुची वाहतूक करणाऱ्या एकास नगर तालुका पोलिसांनी पकडले. त्याच्याकडून २५ लिटर गावठी हातभट्टीची दारु व एक मोटारसायकल असा ३२ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई नगर तालुक्यातील खांडके शिवारातील, पवार तांड्याजवळ, ७ जून रोजी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास केली.

याबाबतची माहिती अशी की नगर तालुका पोलीस, नगर तालुक्यातील खांडके शिवारात पेट्रोलिंग गस्त करीत असताना पवार तांड्याजवळ एक इसम मोटारसायकल वरुन गावठी हातभट्टीची दारु प्लॅस्टिक पिशवी व पोत्यात भरुन वाहतूक करताना मिळून आला. पोलिसांनी त्यास थांबून त्याचे नाव व पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव गहिनीनाथ रंगनाथ चेमटे (वय ३८ रा. खांडके, ता. नगर) असे असल्याचे सांगितले. पोलिसांनी त्याच्या मोटारसायकल वरील पोत्यांची तपासणी केली असता आत मध्ये प्लास्टिकच्या पिशव्यामध्ये २ हजार ५०० रुपये किमतीची २५ लिटर गावठी हातभट्टीची दारु मिळून आली. पोलिसांनी त्याच्याकडील २ हजार ५०० रुपये किमतीची गावठी हातभट्टीची दारु व ३० हजार रुपये किमतीची मोटारसायकल (क्रमांक एम एच ०५ टी ५४ ५२) असा ३२ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल सागर मिसाळ यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नगर तालुका पोलीस ठाण्यात गहिनीनाथ चेमटे याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (अ) (ई) प्रमाणे गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोलीस हवालदार सरोदे हे करीत आहेत.





**अभिनेत्री हिमानी भट्ट शिवपुरी यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान**

गोवा येथील फर्न हॉटेलमध्ये ग्लोबल बुक ऑफ एक्सलेन्स, इंग्लंड च्या वतीने देशातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा लोबल अवॉर्ड २०२५ ने गौरव करण्यात आला. या पुरस्कार सोहळ्यामध्ये चित्रपट अभिनेत्री हिमानी भट्ट शिवपुरी यांना ग्लोबल बुक ऑफ एक्सलेन्स, इंग्लंड चे उपाध्यक्ष डॉ. दीपक हरके व अध्यक्ष डॉ. मनिष कुमार यांच्या हस्ते जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. हिमानी भट्ट शिवपुरी या हम आपके है कौन या चित्रपटांमधील त्यांच्या भूमिकेसाठी प्रसिद्ध आहेत. याचबरोबर त्यांनी राजा (१९९५), दिलवाले दुल्हनिया ले जाएंगे (१९९५), खामोशी (१९९६), हिरो नंबर १ (१९९७), दीवाना मस्ताना (१९९७), बंधन (१९९८), कुछ कुछ होता है (१९९८), बीवी नंबर १ (१९९९), हम साथ-साथ है (१९९९), कभी खुशी कभी गम... (२००१) आणि मैं प्रेम की दिवानी हूं (२००३) यासह इतर अनेक चित्रपटांमध्ये काम केले आहे.

